नोंदणी क्र. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

ऑगष्ट १९५०

वर्ष ५ वें — अंक ७-८

☆


अंकांत—

★

संपादक :
वामन कृष्ण चोरघडे

★

किंमत आठ आणे



अनुक्रमणिका

मध्यप्रांत व वऱ्हाड शाळाखात्याकडून लायब्ररींसाठी मंजुरी मिळालेलें

वर्ष ५ वें] युगवाणी [अंक ७-८

ऑगष्ट १९५०

वार्षिक वर्गणी पांच रुपये सभासदांना फक्त रु. तीन

संपादकीय —

१. युगवाणीचा या वर्षाचा हा आठवा अंक. जुलैचा अंक काढता आला नाही. परंतु वाचकांना एकूण मजकूर पृष्ठांच्या हिशेबाने पूर्ण करण्यांत येणारच आहे. या अंकाचें खास वैशिष्ट्य म्हणजे कै. वा. बापूसाहेब मवाळकर यांचा लेख होय. त्यांचे चिरंजीव श्री. गजाननराव मवाळकर यांचे कडून नागपूरचे एक व्यासंगी इतिहास संशोधक श्री. दे. गो. लांडगे यांनी तो लेख योग्य उपयोगासाठी मागून ठेवला होता व तो त्यांनी युगवाणीला दिला. श्री. म. म. नानासाहेब मिराशी यांनी लेखाला टीप जोडली. या प्रांतांतील वाङ्मयविषयक चळवळीची ज्यांना आवड आहे अशांच्या दृष्टीने अंक संग्राह्य झाला आहे.

२. माझ्याकडे युगवाणीचें संपादकत्व गेल्या ऑगस्टमध्ये आलें होतें. आज वर्ष झालें. युगवाणी माझ्या आमदानींत दर्जाच्या दृष्टीने चढली की पडली हें सांगणें माझें काम नव्हे. मला मात्र हें संपादनाचें काम किति अप्रिय, कटकटीचें व जिकिरीचें असतें याची कल्पना आली.

३. युगवाणींत चाळीस पृष्ठांचा मजकूर येतो. तेवढ्यांत एक प्रबंध, एक लघुकथा, एका साहित्य किंवा कलोपासकाचा परिचय, एक ग्रंथपरीक्षण आणि कविता येवढा मजकूर आल्यास सर्वांचें समाधान होऊन विविधता राहील अशा धोरणाने आजवर चाललों. पण युगवाणी स्वावलंबी नाही, संपूर्ण परावलंबी आहे. त्यामुळे साध्या इच्छा आकांक्षाहि फलद्रुप व्हायला वेळ लागतो. द्रव्य दृष्ट्या युगवाणीची कमालीची ओढाताण होत असल्याने चित्रें, शीर्षकें यांत विविधता आणतां येत नाही.

४. ऑगष्टांतले दग थोर थोर भारतीयांच्या स्मृतिधारा वर्षून जातात; जनतेला परमेश्वर मानणारे जनतात्मवासी लो. टिळक, भारताची महामानवेर सागर म्हणून प्रतिष्ठा वाढविणारे गुरुदेव, आणि सेवेला परमधर्म मानणारे एकनिष्ठ कर्मयोगी महादेवभाई देसाई याच महिन्यांत या देशाच्या अणु अणु अस्तित्वांत विलीन झाले. त्यांच्या महत्तेला शतशत प्रणाम !

५. प्रस्तुत अंक स्वातंत्र दिनाच्या तिसऱ्या सुमुहूर्तावर निघत आहे. या दिनाविषयी तीन वर्षाच्या अवधींत अनेक संमिश्र भावना हृदयांत उठतात. जें वांछिलें, जें कल्पिलें आणि जें डोळा देखिलें यांत महदंतर पडलें आहे. त्यामुळे स्वातंत्र्यदिनाच्या दिवशीच्या आनंदांत परिस्थितीच्या काळ्या सावल्या भेडसावीत आहेत. आमचीं मनें दुःखाने बधिर होत नाहीत आणि सुखाने फुलत पण नाहीत कारण त्यांच्यांत त्राणच राहिलें नाही. परिस्थितीशी झुंजून छाती आटवलेल्या मातेच्या दुग्धनिःशेष स्तनाला मूल उगीच चोखून चोखून दुखवितें तद्वत् सुख-दुःखाचे प्रसंग आमच्याशी आज वर्तन करीत आहेत. कुठे कांहीच आधार नसला म्हणजे मन ईश्वराकडे धांव घेते. ईश्वरा, या परमसुमंगल समयी प्रार्थना येवढीच कीं : —

दुरितांचें तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जें वांछील तो तें लाहो । प्राणिजात ॥

नागपूर १४-८-५०. — वामन कृष्ण चोरघडे.

अनुक्रमणिका

पूज्य साने गुरुजी

वि. भ. कोलते

★

योगायोग तरी किती विचित्र असतात पहा! एरवीं ता. ११ रोजी रविवारी सकाळपासूनच मनाला निषण्णता कां यावी! आणि अपशकून कां घडावे! एप्रिल महिन्याच्या अखेरीस माझ्या पूज्य वडिलांच्या मत्यूमुळे आम्ही सर्वजण मलकापुरास गेलो होतो. त्यांचे अंत्य विधी आटोपून जरी आता बरेच दिवस झाले होते तरी भावांचा व त्यांच्या मुलाबाळांचा निरोप घेऊन मलकापूर सोडून आज नागपूरला येण्यासाठी निघायचे होते. आणि त्यामुळे वडिलांच्या स्मृति पुन्हा तीव्रतेने जागृत होऊन मनाला एकसारखे उदास उदास वाटत होते! गाडीची वेळ झाली होती. स्टेशनवर जायला आम्ही निघणार तोच बातमी आली की नांदुरा स्टेशनजवळ सकाळी ४-५ च्या सुमारास मालगाड्यांची टक्कर होऊन रस्ता नादुरुस्त झाला आहे. त्यामुळे नागपूरकडे जाणारी 'एक्स्प्रेस' केव्हा येईल हें सांगता येत नाही! या बातमीने त्यावेळी फारसे आश्चर्य वाटले नाही हे खरे, पण मनाच्या उदासीनतेत त्यामुळे भर पडली यात मात्र शंका नाही. चार तासांनी उशीरा एकदाची गाडी आली. आम्ही नागपूरला त्यादिवशी एरवीं दुपारी ४ वाजतांच येऊन पोचलो असतो. पण वरील अपघातामुळे रात्री ८ वाजता येऊन पोचलो. व्हरांड्यात सामान उतरवून घेऊन मी माझ्या खोलीचा दरवाजा उघडला तोच बाहेर कुणीतरी कुजबुजत होते ' साने गुरुजी वारले '...

—साने गुरुजी वारले!—माझा त्या बातमीवर विश्वासच बसेना! कसे शक्य आहे हे! तीनचार दिवसापूर्वीच मी मुंबईला होतो. पण गुरुजी इतके आजारी असल्याची काहीच बातमी तेथे नव्हती. तेव्हा त्यांचा मृत्यु होणें शक्य नाही. काहीतरी चुकीची बातमी असली पाहिजे ही! या विश्वासाने पण हादरलेल्या मनाने मी चौकशी केली. तो काय? त्या दिवशी सायंकाळी रेडियोवर देखील गुरुजींच्या मृत्यूची ती बातमी असल्याचे कळले! आणि मग अंतःकरणाला जो धक्का बसला त्याचें वर्णन करतां येणें शक्य नाही! मी दरवाजा उघडला खरा पण मी जागच्या जागी खिळल्यासारखा झालो. सकाळपासून वाटत असलेली आणि वाढत असलेली विषण्णता जणु माझ्या अंतःकरणात

गोठून घट्ट झाली. त्या दुःखाचा उमाळा दाबून, भारावलेल्या मनाने मी पुढे पाहिले तो किती तरी भास होताहेतसे मला वाटले. खादीची शुभ्र वस्त्रे परिधान केलेली साने गुरुजींची ती सडपातळ पण शांत व सात्त्विक मूर्ति माझ्या खोली- तील त्या समोरच्या पलंगावर पडून विश्रांति घेत आहे की काय असें क्षणभर वाटलें. तो दुसऱ्याच क्षणी गुरुजी आता उठून पत्रे लिहू लागल्याचा भास होऊ लागला. घटकाभरात असे वाटू लागले की जणु गुरुजी त्या पलंगाजवळच असलेल्या आरामखुर्चीत बसून माझ्या दिलीप बरोबर हसत खेळत गप्पा करीत आहेत....एक ना दोन, असे कितीतरी भास झाले आणि त्यामुळे मनाला काय वाटले काय ठाऊक, समोरची खिडकी उघडण्याचे निमित्त करून मी हळूच त्या पलंगाजवळ गेलो, बिछान्यावरची रंगीत चादर काढली आणि खालच्या पांढऱ्या शुभ्र चादरीवरून हळूहळू हात फिरवू लागलो.

होय, बरोबर दीड वर्षापूर्वी साने गुरुजी माझ्या घरी याच खोलीत उतरले होते, याच पलंगावर त्यांनी विश्रांति घेतली होती, तेथेच बसून त्यांनी पत्रे लिहिली होती, जवळ असलेल्या त्याच आरामखुर्चीत अंग संकोचून बसून ते दिलीपबरोबर गप्पागोष्टी करीत होते ! ती सर्व दृश्ये जणु मला पुन्हा दिसू लागली ! ते प्रसंग पुन्हा समोर घडत आहेत की काय असे भासू लागले. दीड वर्षाचा काळ म्हणजे काहीच नाही. गुरुजी नुकतेच येऊन गेले असेच आम्ही आजपर्यंत म्हणत होतो आणि आता ते मृत्यु पावल्याची ही बातमी ! कसा विश्वास बसणार या बातमीवर ?

... पण पूज्य साने गुरुजी मृत्यु पावले, समाधिस्थ झाले, निर्वाण पदाला पोचले, हे कठोर सत्य होते. दुसऱ्या दिवशी सकाळी वर्तमानपत्रांनी ते पुनः पुनः सांगितले. हुंदके देत देत, रडत रडत, अश्रु ढाळीत ढाळीत सांगि- तले आणि ते वाचून माझा अशोक मला सांगू लागला ' भाऊ, साने गुरुजी वारले '! त्याचे बोलणे ऐकून दिलीप म्हणूं लागला, ' भाऊ, गुरुजी वारले ' ! कवितेनेहि त्याचाच पुनरुच्चार केला; त्या सर्वांना फार फार दुःख झाले. माझ्या मनावरहि विषण्णतेची गडद छाया पुन्हा पसरली !

आणि त्याला कारणहि तसेच होते. साने गुरुजी म्हणजे महाराष्ट्रांतील एक थोर पुढारी; विद्याविनयशील समाजसेवक, प्रतिभासंपन्न कवि, चतुरस्र लेखक इत्यादि अनेक नात्यांनी ते आम्हाला पूर्वीपासून परिचित होते हे तर खरेच; पण याहिपेक्षा वर्ष दीड वर्षापूर्वी ते नागपूरला आले असतांना त्यांचा व आमचा जो निकट संबंध आला होता त्यावेळी सात्त्विक व्यक्तित्वाचा आह्माला झालेला साक्षात्कार हा अधिक महत्त्वाचा होता. त्यावेळच्या त्यांच्या सहवासाने आमची मने प्रफुल्ल झाली होती, उजळून निघाली होती. साने गुरुजी म्हणजे जणु आमच्याच घरातील फार जुन्या परिचयाची व्यक्ति असे सर्वांना वाटू लागले

१९५०
ऑगस्ट

होते. इतर कोणत्याहि नात्यापेक्षा हे अधिक जवळचे नाते आमच्यामध्ये निर्माण झाले होते आणि म्हणूनच ता. ११ ला रात्री त्यांच्या मृत्यूची कुजबूज कानी येताच मनाला मोठा धक्का बसला. आपले अगदी घरचे, जिव्हाळ्याचे माणूस अंतरले असे वाटून क्षणभर मनाच्या सर्व वृत्ति गोठून गेल्या.

१९४९ च्या जानेवारी–फेब्रुआरी मधे 'नागपूर महाविद्यालया'तील 'शारदा मंडळा'चा रौप्यमहोत्सव साजरा करायचा होता. अध्यक्ष म्हणून साने गुरूजींनी यावे अशी आमची सर्वांची इच्छा होती. त्याप्रमाणे पत्रव्यवहार सुरू झाला. गुरुजींनी आम्हाला नकार दिला. सर्वांची फार निराशा झाली. 'रौप्य' महोत्सवासारख्या प्रसंगाला गुरुजींसारखी सात्त्विकतेची साहित्यमूर्तिच आम्हाला पाहिजे होती. विद्यार्थीवर्गाला त्यांच्या वाङ्मयाची चटक लागलेली होती. त्यांच्यावर ते मनापासून प्रेम करीत होते. पण त्यांना पाहण्याचे भाग्य कुणालाच लाभलेले नव्हते. मीहि या पूर्वी गुरुजींना कधीच पाहिले नव्हते. त्यामुळे तर या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने त्यांना नागपुरात घेऊन येण्याची माझीहि विशेष इच्छा होती. साने गुरुजी म्हणजे मूर्तिमंत विनय. कोणत्याहि उत्सवाचे अध्यक्षपद ते आपणहून स्वीकारतील हे संभवनीय नव्हते. प्रत्यक्ष भेटून गळ घातल्याशिवाय त्यांना आणणे शक्य होणार नाही हे आम्हाला कळून चुकले. विद्यार्थ्यांनी हट्ट धरला. माझ्याहि मनाला ओढ होतीच. म्हणून मी स्वतः मुंबईला गेलो. गुरुजींच्या होकाराची मला फारशी आशा नव्हती. कारण मी स्वत: गुरुजींना विनंति करण्यासाठी निघालो खरा, पण मी कोण ? गुरुजींना मी कधी पाहिले नव्हते, त्यांची माझी कधी भेटगाठ नव्हती, परिचय नव्हता; मग माझ्या जाण्याचा उपयोग काय ? खरे म्हणजे मी भीतभीतच निघालो. आपली विनंती मान्य केली नाही तर आपण अमूक गृहस्थाला बरोबर नेऊ, त्यांच्याकडून जमले नाही तर आणखी दुसऱ्या कोणाला घेउन जाऊ असे नाना विचार मी मनात करीत होतो. दुसऱ्या दिवशी सकाळी 'साधना' कचेरीत जाऊन पोचलो. गुरूजी तेथे असल्याचे कळले. मला आनंद वाटला. मी निरोप पाठविला तोच तावडतोब किडकिडीत बांध्याची, खादीचे धोतर, सदरा आणि टोपी घातलेली एक मूर्ति माझ्यासमोर येऊन हात जोडून उभी राहिली. मी त्यांना त्यापूर्वी प्रत्यक्ष पाहिले नव्हते तरी 'साने गुरूजी' ते हेच हे मी तात्काळ ओळखले, विनीत भावाने त्यांना नमस्कार केला आणि अत्यंत नम्रतेने आमची विनंती त्यांच्या कानावर घातली. ओलावलेल्या डोळ्यांनी गुरूजी बोलले 'मला येता येणार नाही, मी आपणाला कळवलेच आहे. त्यापेक्षा आता अधिक काय सांगणार ?' आणि असे म्हणून ते तसेच बराच वेळ उभे राहिले ! मीहि उभा राहिलो. काय बोलावे ते मला कळेना. थोड्या वेळाने मीच त्यांना खाली बसण्याची विनंती केली. आपल्या खुर्चीवर ते बसले आणि समोरच्या खुर्चीवर मी बसलो. मी पुन्हा विद्यार्थ्यांतर्फे म्हणून रदबदली करू लागलो. खाली पाहत पाहतच गुरूजी म्हणाले, 'पण खरे असे आहे की तुमचा हा वाङ्मयमंडळाचा उत्सव आहे

आणि वाङ्‌मय म्हणजे काय हे तर मला कळत नाही. मी तेथे यऊन काय सांगू ? माझ्याजवळ सांगण्यासारखे काही नाही. मला नेण्याचा आग्रह करू नका. माझी फजीती करू नका. मी झाडुवाला आहे. नागपुरात काही सेवा करायची असेल, रस्ते झाडायचे असतील तर मला सांगा. मी येण्याला एका पायावर तयार आहे.' त्यांचा कंठ सद्‌गदित झाला होता आणि डोळयामधून आसवे वाहत होती. मी अधिकच भांबावलो. त्यांच्याकडे पाहण्याचा मी वारंवार प्रयत्न केला, पण गुरुजी आपली दृष्टि वरच करीनात. दोन्ही हात जोडून मस्तक विनम्रतेने खाली करून ते जे बसले ते किती वेळ ! दहा मिनीटें झाली, वीस झाली, अर्धा तास निघून गेला पण गुरुजी वर पाहात नव्हते आणि कांही बोलत नव्हते. मीच म्हटले 'गुरुजी' आमची निराशा करू नका. सर्व विद्यार्थी आपल्या दर्शनासाठी आतुर झालेले आहेत. त्यांना निराश करू नका. मी आपला होकार घेतल्यावाचून जाणार नाही.. आता आपणाला इतर कामे आहेत. मी उद्या सकाळी पुन्हा आपणाकडे येईन. 'नको नको, उद्या तरी मी तुम्हाला काय सांगणार ? मग कशाला येण्याचे श्रम घेता ? नका येऊ उद्या तुम्ही या कामासाठी' – 'होय मी येणारच. आपण नागपुरकडे अजून आला नाही –' 'नाही कसा ? दोन वर्षांपूर्वी हरिजनांच्या कार्याकरता मी आलो होतो. आपल्या मंत्र्यांनी मला तेथे माझे काम करू दिले नाही व बोलू दिले नाही.'

'म्हणूनच तर आता आपण यावे आणि आम्हाला चार शब्द सांगावे ही विनंति आहे. आपण आमच्या विनंतीचा पुन्हा विचार करा. मी उद्या येऊन भेटतो'

असे बोलून निराश व जड अंतःकरणाने मी तेथून बाहेर पडलो. साने गुरुजींचे हेच प्रथम दर्शन. हीच पहिली भेट. किती साधे, किती नम्र, किती करुण, किती कळकळीचे ! बोलण्यात जिव्हाळा किती, तळमळ किती ! साध्या तुटक शब्दांतून ऐकणाऱ्याच्या समोर जणू ते आपले काळीज उलगडून ठेवीत असत. त्यांच्या प्रत्येक शब्दामागे भावनांनी ओथंबून वाहणारें त्यांचें अंतःकरणच उभें असण्याचा येणारा अनुभव — किती गोड ! किती हृदय हलविणारा ! आणि डोळयांतून वाहणारे त्यांचे ते अश्रू ! छे, हे अश्रू नव्हत; अहंकाराच्या किंवा मोठेपणाचा दुरूनहि वारा सहन न होण्याचा त्यांच्या सात्विक अंतःकरणाचा हा पाझर आहे; त्या अंतःकरणात कोपरान् कोपरा व्यापून राहिलेल्या विनम्रतेचा हा द्रव आहे. सर्व प्रकारचें इतकें विपुल वाङ्मय निर्माण करूनहि वाङ्मयाशी माझा कांही संबंध नाही असे म्हणण्यात त्यांची विनम्रताच नव्हती काय ? गुरुजींच्या त्या पहिल्याच भेटीचा माझ्या मनावर फार परिणाम झाला आणि काही झाले तरी त्यांचा होकार घेतल्यावाचून नागपुरला परत जायचे नाही असा मी निश्चय केला.

दुपारी घरी परतलो तो वर्तमानपत्रांत वाचले की सायंकाळी आचार्य भागवतांचे कुठे तरी व्याख्यान आहे म्हणून ! मला एक कल्पना सुचली. सायंकाळी

मी आचार्य भागवतांची भेट घेतली. गुरुजींच्या जवळ आमच्यासाठी भीड खर्च करण्याची मी त्यांना विनंती केली. त्यांनी ती मान्य केली आणि गुरुजींना वश करण्याचा मला त्यांनी एक मंत्र दिला. दुसऱ्या दिवशी मी सकाळी गुरुजींकडे पुन्हा गेलों. त्यांना वंदन केले. आदल्या दिवशींची विनंती पुन्हा त्यांच्या कानावर घातली. तिला तेच आदल्या दिवशींचें उत्तर मिळाले. गुरुजी हात जोडून पाणावले-ल्या डोळयांनी खाली मान घालून बसून होते योग्य वेळाने मीच म्हटले :—

'गुरुजी, हरिजनांना पंढरपुरच्या देवळात प्रवेश मिळाल्याखेरीज अन्न ग्रहण करायचे नाही असा आपण संकल्प केला होता ना! मीहि आज तसाच काहीसा निश्चय करून आलो आहे. आपला होकार घेतल्यावाचून मी आज मुळी जेवणारच नाही " गुरुजी एकदम म्हणाले छे छे असे तुम्ही करू नका. मी येईन नागपुरला पण खरी अडचण आहे, मी तेथे येऊन सांगू काय? बोलू काय? " 'आपण या तर खरे!' काय बोलायचे काय नाही ते सगळे जमेल. आपण आपल्या अंतःकरणाला विचारा! माझे काम झालेच होते. मग फारशी आडवळणें न घेता गुरुजींनी होकार दिला, आम्ही तारखा ठरवल्या आणि गुरुजींचे आभार मानून आणि त्यांना वंदन करून मी उल्हासित वृत्तीने परतलो.

तो दिवस मोठ्या आनंदात गेला. मुंबईतील माझे सर्व स्नेही मला म्हणाले, 'साने गुरुजींनी येण्याचे कबूल केलं हा तुमचा केवढा तरी विजय समजतो आम्ही.' त्यांच्या त्या बोलण्यामुळे तर मला अधिकच आनंद झाला. मी नागपुरला परतलो. ठरल्या प्रमाणे गुरुजी नागपुरला आले आणि आमचा रौप्यमहोत्सव कोणत्याहि साहित्यसंमेलनाला लाजवील अशा मोठ्या प्रमाणांत साजरा झाला. गुरुजींच्या आगमनामुळे विद्यार्थ्यांचा उत्साह उतास पोचला होता. अर्थात आमच्या शारदा-मंडळाच्या रौप्यमहोत्सवाच्या यशस्वीतेचे श्रेय गुरुजींच्या अस्तित्वाकडे व त्यांच्या आशीर्वादाकडे जाते हे सांगणे नकोच.

उत्सव ता. ४, ५, व ६ फेब्रु. १९४९ असा तीन दिवस होता. पण साने गुरुजी नागपुरला ता. ४ व ५ रोजी म्हणजे फक्त दोनच दिवस होते. ता. ६ रोजी सकाळी ते उमरावतीला गेले. या दोन्ही दिवशी त्यांचा मुक्काम माझ्याकडे होता. त्यामुळेच त्यांच्या सान्निध्याचे आणि सहवासाचे परम भाग्य आम्हाला लाभू शकलें. हे दोन दिवस म्हणजे आमच्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचे दिवस होते. कारण महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील अत्यंत थोर अशा त्या संताची थोडी फार सेवा करण्याची संधि आम्हाला या दोन दिवसात मिळाली. मला आठवतें, की लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी या दोन्ही लोकोत्तर पुरुषांचे जवळून दर्शन न झाल्यामुळे मला नेहमी हळहळ वाटायची. मी प्राथमिक शाळेत असतांना लोकमान्य टिळक मलकापूरला आले होते. पण सरकारी अधिकाऱ्यांच्या हुकुमावरून आमचे हेड मास्तर रानडे यांनी त्या दिवशी आम्हाला शाळेत जवळ

जवळ कोंडून ठेवले होते आणि म्हणून टिळकांचे दर्शन मला होऊ शकले नाही. महात्माजींना मी पाहिले होते, नाही असे नाही; पण ते फार दुरून. त्यांची कोणत्या तरी निमित्ताने भेट घेऊन त्यांचे चार शब्द ऐकावे अशी मनात फार इच्छा होती. मुलाबाळांना घेऊन एखादे दिवशी वर्ध्याला जावे. तेथे वामनराव चोरघड्यांच्याकडे मुक्काम करावा. त्यांच्या मध्यस्थीने पूज्य विनोबांचा किंवा काका साहेबांचा वशिला लावावा आणि सेवाग्रामला जाऊन महात्माजींचे दर्शन घ्यावें असा विचार अनेकदा केला होता. पण महात्माजींच्या आकस्मिक मृत्यूमुळे तो जागच्या जागी जिरला, त्यामुळे त्यांचीहि भेट अशी होऊ शकली नाही. माझी ती इच्छा अतृप्तच राहिली आणि त्यामुळे माझ्या मनाला अनेकदा रुखरुख वाटते. सुदैवाने साने गुरुजींच्या बाबतीत मात्र तशी रुखरुख वाटायला कारण राहिलें नाही. १९३१ – ३२ मध्ये खानदेशातील जळगावं येथे असताना गुरुजीसंबंधी मी पुष्कळ ऐकले होते. तेव्हा पासूनच त्यांना पाहण्याची व भेटण्याची उत्सुकता मनामध्ये निर्माण झाली होती. आणि ती त्यांच्या वाङ्मयामुळे वाढत होती. 'श्यामची आई' हे त्यांचे मी वाचलेले पहिले पुस्तक. ते वाचत असतांना त्यातील करुणकोमल प्रसंगानी जसे डोळे डबडबले तसेच त्यात सर्वत्र भरून राहिलेल्या सात्विकतेमुळे मन पवित्र झाल्यासारखे वाटले. इतर साहित्यिकांच्या लिखाणाहून सर्वस्वी निराळे, मनोरंजक असूनहि सात्विक व अंतःकरणाची उंची वाढविणारे असे काही तरी अगदी नवीन आपण वाचत असल्याचा आनंद मला त्यावेळी अनुभवायला सांपडला. श्याम, धडपडणारी मुले पुनर्जन्म, क्रांति, आस्तिक इत्यादि त्यांच्या कादंबऱ्यांच्या वाचनाने हा आनंद एकसारखा वाढत होता. भारतीय संस्कृतीवरचे गुरूजींचे पुस्तक वाचून तर मी मोहून गेलो होतो. या पुस्तकात शास्त्रीय विवेचन नाही आणि शास्त्रीय दृष्टि हि नाही हे खरे. पण वाचकांच्या अंतःकरणावर एखाद्या तत्वाचा संस्कार घडवून आणण्यासाठी जो जिवंत जिव्हाळा लागतो तो त्यात भरपूर आहे. ते एक सुंदर गद्यकाव्य आहे. मराठी निबंधाच्या तासांत त्यातील अनेक सुंदर उतारे मी माझ्या विद्यार्थ्यांना वाचून दाखवीत असे. लेखणीच्या साहाय्याने भावनांचे उचंबळ निर्माण करणाऱ्या या लेखकाचे व्यक्तित्व किती थोर असले पाहिजे याचा विचार करू लागलो म्हणजे त्यांच्या भेटीची आणि दर्शनाची अनिवार उत्कंठा निर्माण होई. गेल्या दोन चार वर्षांत माझ्या मुलांच्या हाती गुरुजींच्या 'गोड गोष्टी' दिसल्या नाहीत असा दिवस गेला नाही. माझी मुलगी कविता आणि मुलगा दिलीप यांना तर या गोष्टींनी नुसते वेड लावले होते. लहान मोठ्यांची अंतःकरणे सारखेच वेधून घेणारे एवढे सुंदर साहित्य निर्माण करणाऱ्या साने गुरुजींना आपण पाहिलेलेंहि नसावे याचे मनाला फार वाईट वाटे. उमरावतीस असतांना तेथील विद्यालयातील मराठी वाङ्मयमंडळासाठी त्यांना आणण्याचा मी प्रयत्न करून पाहिला होता. पण त्यावेळी सरकारी तुरुंग त्यांच्याबरोबर पाठशिवणीचा खेळ

एकसारखा खेळत असल्यामुळे त्याला यश आले नव्हते. ह्मणूनच यावेळी ह्मणजे दीड वर्षापूर्वी ते जेव्हा नागपूरला आले आणि आमच्याकडे उतरले तेव्हा मला किती धन्यता वाटली असेल याची कल्पना करावी. माझी मुले तर 'गुरुजी, गुरुजी' ह्मणून त्यांच्याभोवती एकसारखी असत. या सर्व मंगल व प्रसन्न वातावरणामुळेच त्यांच्या सहवासाचे ते दोन दिवस मला अतिशय सुखाचे वाटले. आणि आता गुरुजींच्या आकस्मिक निधनामुळे तर त्यांना अधिकच रम्यता आली आहे. मला एखादे वेळी असे वाटतेहि की गुरुजींना त्यावेळी आपण नागपुरात आणले हे किती छान झाले ! त्यामुळे माझ्या मुलांना त्यांचे दर्शन होऊं शकले, त्यांच्याजवळ हसण्या खेळण्याचा आनंद ते लुटू शकले. पण माझीच मुले काय ह्मणुन !— नागपुरातील सर्वच बालगोपालांना ते दिसू शकले, ते त्यांचे दर्शन घेऊं शकले, त्यांचा उपदेश ऐकू शकले. एरवी, गुरुजींच्या झालेल्या या आकस्मिक मृत्युमुळे अनेकांना त्यांच्या दर्शनावाचून हुरहुरावे लागले असते. खरेच आहे. आपल्या काळात विद्यमान असलेल्या थोर पुरुषाला आपण डोळ्यांनी पाहिलेलेहि असू नये याच्यापरते दुर्भाग्य ते कोणते ?

साने गुरुजी म्हणजे सेवेची आणि सौजन्याची, त्यागाची आणि वैराग्याची मूर्तिमंत प्रतिमा होती. जणु सेवावृत्तीने त्यांच्या रूपाने पार्थिव देह धारण केला होता. त्यांचे जीवन हे सेवेसाठी अर्पित जीवन होते. देशाची—समाजाची सेवा हेच त्यांचे एकमेव ध्येय होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपल्या मृत्युपत्रांत म्हटल्याप्रमाणे 'हे मातृभूमि तुजला मन वाहिलेले। वक्तृत्व वाग्विभवहि तुज अर्पियेले। तूं तेचि अर्पिली नवी कविता रसाला । लेखाप्रती विषय तूंच अनन्य झाला।' हे उद्‌गार साने गुरुजींनाहि यथार्थतेने लागू पडतात. गुरुजींचे सुंदर साहित्य हा त्यांच्या समाजसेवाव्रताचाच रमणीय आविष्कार होय. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी महात्माजींनी चालविलेल्या लढ्यात त्यांनी आपले सर्वस्व अर्पण केले. परकीय ब्रिटिशांच्या विरुद्ध जसे ते लढले तसेच शेतकरी आणि मजूर यांची दैन्यावस्था दूर करण्यासाठी स्वदेशी भांडवलवाल्यांशीहि लढले. या लढ्यात भाग घेत असतांना सरकारने गुरुजींना अनेकदा तुरुंगवासाची शिक्षा दिली. किंबहुना १९३१ पासून तों १९४५ च्या कालावधीत ते तुरुंगातच अधिक काळ होते. तेथे असतांनाच गुरुजींनी आपले बहुतेक लिखाण लिहिले. त्यांनी आपल्या निरनिराळ्या पुस्तकांना लिहिलेल्या लहानसहान प्रस्तावना काळजीपूर्वक वाचल्या म्हणजे ही गोष्ट स्पष्टपणे दिसून येते. देशसेवा करीत असतांना मिळालेल्या कारावासात लिहिलेल्या त्यांच्या या साहित्यात देशप्रेम आणि समाजसेवा यांची रमणीय चित्रे रेखाटली गेली असल्यास आश्चर्य नाही. तेथे त्यांनी जसे स्वतंत्र लेखन केले तशी परभाषांतील वाङ्मयाची सुंदर भाषांतरेहि केली. भगिनी निवेदिता यांचे ग्रंथ, कला ह्मणजे काय, हा टॉलस्टॉयचा ग्रंथ, ॲमिल याची दैनंदिनी, पाश्चात्य साहित्यातील उत्तमोत्तम गोष्टी असे अनेक ग्रंथ त्यांनी भाषांतर वा रूपांतर करून मराठी वाचकांच्या

हाती दिले. हे सर्व साहित्य ह्मणजे मराठी भाषेचे सुंदर अलंकार होत यांत शंका नाही.

जिथे सेवा आहे तिथे त्याग आलाच. गुरुजींनी ज्याला संकुचित अर्थाने 'आपले' म्हणता येईल असे काय मागे ठेवले आहे ! त्यांचे साहित्य सेवेसाठी होते आणि त्यांची सेवा समाजासाठी होती. या समाजातील ' दुरिताचे तिमिर जावो । विश्व स्वधर्मसूर्ये पाहो । जो जे वांछील तो ते लाहो । प्राणीजात ' अशी ज्ञानेश्वर माउलींप्रमाणे साने गुरुजींच्याहि अंतःकरणातील सात्त्विक तळमळ होती. सामान्यातील सामान्य माणसाचे देखील दुःख आणि दैन्य नाहीसे व्हावे ह्मणून त्यांनी 'साधना' सुरू केली होती आणि या साधनेसाठी आपले सर्वस्व समर्पण केले होते. त्यांच्या या वृतीचा एक हृद्य आविष्कार मला येथे अनुभवायला सापडला. त्याचे विस्मरण होणे शक्य नाही. 'शारदामंडळा'ने गुरुजींना पहिल्या वर्गाचा प्रवास खर्च देऊ केला होता. पण त्यांनी पहिल्या वर्गाने प्रवास करण्याचे नाकारले. ' वरच्या वर्गाने प्रवास करणं हा आमचा धर्म नव्हे ! ' किती संतवृत्तीचे उद्‌गार आहेत हे ! तिसऱ्या वर्गाने प्रवास करून राहिलेले पैसे 'साधने'साठी खर्च करण्याची त्यांनी परवानगी मागितली. आम्ही त्यांना परवानगी देणारे कोण ? त्यांच्यासाठी काढून ठेवलेल्या प्रवासखर्चाच्या पैशाचा विनियोग कसा करायचा हे ठरवणे सर्वस्वी त्यांच्या इच्छेवर अवलंबून होते. तरीहि त्यांनी मंडळाला विचारले यांत त्यांचे अपरंपार सौजन्यच दिसून येत नाही काय ? पण खरी मौज पुढेच आहे. शारदामंडळाने त्यांच्याकडे प्रवासखर्चासाठी म्हणून १०० रुपये आधीच पाठवले होते. नागपूरचा मुक्काम आटोपल्यावर ते उमरावतीस जाण्याची तयारी करू लागले. मधेच खिशातील पैसे काढून ते मला म्हणाले, " भाऊ, माझ्या प्रवासासाठी फक्त २७ रुपये मला लागले. बाकीचे ७३ रुपये हे परत घ्या ! " त्यांच्या तोंडचे हे वाक्य ऐकून मी चकित झालो ! केवढी निःस्वार्थ बुद्धि ही ! मी म्हटले.' छे छे गुरुजी, असे होणार नाही. 'साधने'साठी का होईनात पण आपण हे आणि बाकीचे राहिलेले पैसे घेतलेच पाहिजेत. " ते त्यांच्या खिशात कोंबताना आम्हाला किती प्रयास पडले ते आमचे आम्हासच ठाऊक.

त्यांच्या नागपूरच्या मुक्कामात सेवा आणि त्याग या वृत्तींच्या रमणीय आविष्काराबरोबरच सौजन्याचाहि वर्षाव होत होता नागपूरला ते ' शारदामंडळा ' च्या उत्सवासाठी आले असल्यामुळे त्यांच्या कार्यक्रमाची सर्व सूत्रे त्यांनी माझ्या आधीन केली होती आणि आनंदाची गोष्ट अशी की मी ठरवून दिलेला कार्यक्रम त्यांनी कसोशीने पाळला. गुरुजी नागपूरला येऊन पोचताच त्यांच्यावर आमंत्रणांचा नुसता वर्षाव होऊ लागला. कुठे भेटीचीं, कुठे भोजनाची तर कुठे व्याख्यानांची. गुरुजींनी सर्व आमंत्रणे स्वीकारली. त्यांनी

कुणालाहि निराश केले नाही. प्रत्येक ठिकाणी थोडा वेळ का होईना पण ते सर्वत्र जाऊन आले. दुसऱ्या दिवशी सकाळपासून ह्या भेटीगाठींचा कार्यक्रम ठरला होता. सकाळी ७ वा. त्यांना माझ्या घराजवळच राहणाऱ्या सौ. पुष्पाताई भावे यांच्याकडे जायचे होते. आदल्या दिवशी सायंकाळी त्यांचे अध्यक्षीय भाषण व रात्री श्री. सोपानदेव चौधरी, राजा बढे आणि यशवंत यांचे काव्यगायन होते. त्यामुळे साहजिक जागरण झालेले. तरी हाक मारताच गुरुजी ६॥ ला उठून तयार. ६॥। वाजता बाहेर निघण्यासाठी सज्ज. त्यांना नेण्यासाठी सौ. भाव्यांच्याकडून कोणी मुलगा यायचा होता तो आला नाही. म्हणून गुरुजींनी आमच्या दिलीपलाच आपला नेता म्हणजे मार्गदर्शक बनवले; आणि त्याच्याशी गप्पागोष्टी करीत ७ पूर्वीच ते ठरल्या ठिकाणी जाऊन स्वतःच हजर झाले! आपल्या पुढच्या कार्यक्रमांना उशीर होऊ नये म्हणून किती ही काळजी! असे असूनहि त्यांच्या सौजन्यामुळे त्यांना प्रत्येक ठिकाणी थोडे अधिक थांबावे लागे आणि त्यामुळे पुढच्या ठिकाणी उशीर होत होता हे खरे. पण त्यामुळे ते कधी रागावले नाहीत की त्यांच्या कपाळाला आठी पडली नाही. ते सर्व ठिकाणी गेले. त्यांनी विद्यालयांना भेटी दिल्या, शाळांना भेटी दिल्या, तेथे लहान मुलांना त्यांनी गोष्टी सांगितल्या, 'भगिनीमंडळा'तील भगिनींबरोबर त्यांनी सुखसंवाद केला, नगर वाचनालयात भाषण केले आणि चिटणीस पार्कमधील त्या विराट जनसमूहासमोर सध्याच्या राजकीय परिस्थितीचे दोन तासपर्यंत आपल्या अस्खलित वाणीने विदारक विश्लेषण केले. आणि इतके करूनहि लागलीच श्री. वासुदेवराव भावे यांच्याकडे दोन घास जेवून रात्री 'शारदामंडळा'च्या नाटकाला उशीरा का होईना पण तयारच! हे सर्व कार्यक्रम उरकण्याची त्यांची तत्परता आश्चर्यचकित करून सोडणारी होती. मोठ्यात मोठे आणि लहानाबरोबर लहान व्हायचे ही त्यांची जणु सहजवृत्ति म्हणूनच 'शारदा मंडळा'त साहित्यासंबंधी बोलणारे आणि चिटणीस पार्कमधे राजकीय अधःपतनाचे चित्र रेखाटणारे गुरुजी माझ्या मुलाशी घरी येताच तात्काळ समरस होत. आमच्या दिलीपचे आणि त्यांचे सूत विशेष जमले होते. त्याच्याजवळ त्यांनी गोष्टी केल्या, त्याला कहाण्या सांगितल्या, त्याच्याकडून श्लोक म्हणवून घेतले, त्याला श्लोक म्हणून दाखवले. आणि दुपारी तर गुरुजी आणि दिलीप घरभर धावून पाठशिवणीचा खेळहि खेळले. भाव्यांच्याकडे त्यांनी दोघांनी एकाच बशीतून शिरा खाल्ला. आपणाला आश्चर्य वाटेल पण गुरुजी आमच्या कवितेबरोबर झिम्माहि खेळले! मुलाशी समरस होणारे केवढे थोर अंतःकरण! केवढे हे त्यांचे सौजन्य! 'करी मनोरंजन जो मुलांचे। जडेल नाते प्रभूशी तयाचे' ही त्यांची श्रद्धा होती. त्यांनी जन्मभर मुलांसाठी लिहिले आणि त्यांचे मनोरंजन केले. म्हणूनच तर प्रभूने त्यांच्याशी नाते जोडण्याची घाई केली नसावी ना अशी शंका मनात डोकावल्यावाचून राहत नाही.

अनुक्रमणिका

गुरुजींचे बोलणे अतिशय नम्रतेचे आणि वागणे अतिशय हलुवारपणाचे. त्यानंतर बोलतांना आणि घरात वावरतांना पाहून ज्ञानेश्वरांनी वर्णन केलेल्या ज्ञानी भक्ताची एकसारखी आठवण व्हायची. 'पुढां स्नेह पाझरे। माघा चालती अक्षरें। शद्ब पाठी अवतरे। कृपा आधी॥ तंव बोलणेचि नाही। बोलो म्हणे जरी काही। तरी बोल कोणाही। खुपेल का॥ तैसे साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शद्ब जैसे कल्होळ। अमृताचे॥ असे त्या ज्ञानी भक्ताचे बोलणे आणि 'कमळावरी भ्रमर। पाय ठेविती हळुवार। कुचंबेल केसर। इया शंका॥ तेसे परमाणु पां गुंतले। जाणूनि जीव सानुले। तेथ कारुण्यामाजी पाउलें। लपवूनि चाले॥' असे त्याचे हळुवार चालणे. साने गुरुजींच्या बोलण्याचालण्याला हे वर्णन अक्षरशः लागू पडते! पण यात आश्चर्य ते काय? कारण साने गुरुजी म्हणजे आधुनिक संतच होते. सौजन्य कुठे आकाराला आले असेल तर ते त्यांच्याच ठिकाणी. त्यांच्या डोळ्यात कारुण्य होते, वाणीत माधुर्य होते, लेखणीत लालित्य होते. त्यांचे वक्तृत्व म्हणजे धाराप्रवाही गंगेचा ओघच जणु! त्यात चंद्राची शीतलता आणि समोर बसलेल्या जनसागराचे अंतःकरण उचंबळवून सोडण्याचे विलक्षण सामर्थ्य होते. आपल्या भाषणाने प्रसंगी ते श्रोत्यांना रडवीतहि, कधी कारुण्याने तर कधी सात्विक भावांनी! आपल्या वाणीच्या आणि लेखणीच्या या अलौकिक सामर्थ्याने त्यांनी महाराष्ट्रातील आबालवृद्धांची अंतःकरणे कधीच जिंकून घेतली होती. लहान मुलामध्ये तर त्यांची इतकी लोकप्रियता दुसऱ्या कोणत्याहि लेखकाला मिळाली नाही. त्यांच्या गोड आणि आवडत्या गोष्टींनी साने गुरुजी हे लहानमोठ्या सर्व मुलांचे अत्यंत आवडते झाले होते. उदयाला येऊ लागलेल्या या नवीन पिढीच्या अंतःकरणावर साने गुरुजींनी मिळविलेला अपूर्व विजय पाहून मला नेहमी वाटावयाचे की मतमतांतरांनी बुजबुजलेल्या आणि शतशः भंगलेल्या या महाराष्ट्रात सत्वशील आणि चारित्र्यसंपन्न अशी नवीन पिढी निर्माण करण्याचे सामर्थ्य फक्त गुरुजींच्याच ठिकाणी आहे! देशातील जनतेचे ज्यांनी कल्याण करायचे त्यांनीच अधिकारोन्मत्त आणि शीलभ्रष्ट होऊन जनतेची पिळवणूक चालवलेली पाहून गुरुजींच्या भावनोत्कट अंतःकरणाला अतिशय पीळ पडायचा. 'ऐसा हा आकांत पहावेना डोळा' अशा मनःस्थितीमुळे त्यांचे प्राण वारंवार गोळा होऊ लागले आणि ही तीव्र वेदना सहन होत नव्हती म्हणूनच त्यांनी आत्मबलिदान केले. आपल्या या बलिदानातून तरी समतासंपन्न असे नवीन 'महाराष्ट्र' निर्माण होईल असे त्यांना वाटत असले पाहिजे. गुरुजींची ही इच्छा सफल करणे आता आपल्याच स्वाधीन नाही काय?

ग्रंथपरीक्षण--

सुश्लोक मेघ*

वा. वि. मिराशी

★

कोल्हापूरचे रसिक कवि डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे यांनी कविकुलगुरु कालिदासाच्या मेघदूताचें एक सुंदर मराठी रूपांतर 'सुश्लोक मेघ' यानावानें प्रसिद्ध केलें आहे. श्रयुत श्रीखंड यांचा व्यवसाय डॉक्टरीचा आहे. या व्यवसायांत सामान्यत: रसिकता, वाङ्मयाभ्यास, काव्यनिर्मिति इत्यादिकांना क्वचितच अवकाश मिळावयाचा! अशा प्रतिकूल परिस्थितींतहि डॉ. श्रीखंडे यांनी आपल्या नैसर्गिक गुणांचा लोप होऊ दिला नाही व उत्तरोत्तर उत्कृष्ट काव्यग्रंथांची मराठी वाङ्मयांत भर घातली हें त्यांस अत्यंत भूषणावह आहे. मराठी वाचकांस डॉक्टर साहेबांचा परिचय त्यांच्या सुश्लोक गोविन्द व सुश्लोककुमार या काव्यकृतींनी अगोदरच झाला आहे. त्यांच्या या कृति 'सुश्लोक' किंवा उत्तम वृत्तांत असून त्यांनी आपल्या जनकासहि सुश्लोक किंवा सुकीर्तिमान् केलें आहे. डॉ. श्रीखंडे यांचे ठिकाणीं सहृदयता, संस्कृत कवींविषयीं निरतिशय प्रेम, संस्कृत व मराठी भाषांवर सारखेंच प्रभुत्व, सुश्लिष्ट शब्दयोजनाकौशल्य इत्यादि गुण वसत असल्यामुळे संस्कृत काव्यांचे त्यांचे हे अनुवाद अत्यंत उत्कृष्ट झाले आहेत. प्रस्तुत 'सुश्लोक मेघानें' ने त्यांच्या कीर्तींत भरच पडेल.

कालिदासाचें मेघदूत काव्य संस्कृत वाङ्मयात अपूर्व गणलें जातें. शाकुन्तल, रघुवंश इत्यादि इतर नाटकें न रचतां कालिदासाने केवळ मेघदूतच रचलें असतें तरी त्याची कीर्ति अजरामर झाली असती असें अनेक रसिकांनी म्हटलें आहे. 'मेघदूता'च्या निर्मितीनंतर अनेकांनी त्याचें अनुकरण केलें. किंबहुना या काव्याच्या योगाने दूतकाव्याचा एक नवीनच संप्रदाय संस्कृत वाङ्मयांत सुरू झाला. या काव्याची लोकप्रियता त्यावरच्या संस्कृत टीकांच्या संख्येवरूनहि अजमावता येईल. सध्या ज्ञात अशा मेघदूतावरील निदान पन्नास टीका उपलब्ध आहेत. या शिवाय अज्ञात वा अप्रकाशित अशा कितीतरी असतील! आधुनिक रसिकांवरहि या काव्याने तशीच मोहनी घातली आहे. इंग्रजी भाषेंत याचा पहिला अनुवाद सन १८१३ मध्ये

* सुश्लोक मेघ (लेखक व प्रकाशक डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे, एम्. बी. बी. एस. कोल्हापूर, किंमत ४ रु.)

डॉ. होरेस हेमन विल्सन याने केला त्याने गटे, शिलर इत्यादि युरोपीयन कवींना मोहून टाकलें. भारतांत तर जिच्या मध्ये मेघदूताचा अनुवाद झाला नाही अशी एकहि प्रमुख भाषा नसेल. मराठी मध्ये थोरल्या चिपळूणकर शास्त्रीबुवांपासून गतवर्षी 'मौजे'च्या दिवाळी अंकांत प्रसिद्ध झालेल्या अनुवादाचे कर्ते श्री. वि. वा. शिरवाडकर यांच्या पर्यंत अनेक कवींनी या रम्य कृतीला समवृत्ती किंवा भिन्नवृत्ती पेहराव देण्याचा प्रयत्न केला आहे. या सर्वांत डॉ. श्रीखंडे यांचा 'सुश्लोक मेघ' अनेक दृष्टींनी वैशिष्ट्ययुक्त आहे.

आतांपर्यंत मेघदूताच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. तरी भिन्न भिन्न प्रदेशांतून या काव्याचीं हस्तलिखितें व त्यावरच्या टीका जमवून त्यांच्या साह्याने केलेल्या संशोधित आवृत्तीची अद्यापि उणीव भासते. या काव्याचा मार्मिकपणे व संशोधनपूर्वक अभ्यास केला असतां त्यावर किती प्रकाश पडतो हें नुकतेंच डॉ. आर. सी. हजरा यांनीं इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टर्ली [पु. २५, पृ. २७५] मधील आपल्या लेखांत दाखवून दिलें आहे.

'मेघदूत' काव्याच्या निरनिराळ्या आवृत्तींत भिन्न भिन्न श्लोकसंख्या आढळते. ई. स. च्या नवव्या शतकांत राष्ट्रकूट नृपति अमोघवर्ष याच्या दरबारच्या जिनसेन नामक जैन कवीने हें सबंध काव्यच समस्यापूर्तिरूपाने आपल्या 'पार्श्वनाथाभ्युदय' या काव्यांत गोंवून दिलें. या जैन कवीच्या कृतीवरून कालिदासाच्या या काव्याचें 'मेघदूत' हें नांव आणि त्यांतील श्लोकांचे तत्कालीन पाठ, अनुक्रम व संख्या निश्चित होतात. सध्या उपलब्ध असलेल्या मेघदूतावरच्या सर्व टीका यानंतरच्या आहेत. म्हणून कै. प्रो. काशिनाथ बापूजी पाठक यांनी जिनसेनाच्या पाठांना अनुसरून आपली आवृत्ति छापली तींत १२० श्लोक आहेत. डॉ. श्रीखंडे यांनी कोणती पाठपरंपरा अनुसरली याची माहिती त्यांच्या 'अवतरणिके'त नाही. त्यांनी उज्जैनीच्या वर्णनांतील 'प्रद्योतस्य प्रियदुहितरं' [पाठकप्रत श्लोक ३२] 'हारांस्तारांस्तरलगुटिकान्' [श्लोक ३३] हे दोन, व अलकेच्या वर्णनांतील 'पत्रश्यामा दिनकरहयस्पर्धिनो' [श्लोक ७८] हा एक असे तीन श्लोक गाळलेले दिसतात. त्यामुळे त्यांच्या पाठांतील संख्या ११७ झाली आहे. मल्लीनाथानेंही हे तीन व दुसरे दोन श्लोक प्रक्षिप्त मानले आहेत. पण जिनसेनाने ते आपल्या काव्यांत घेतले आहेत. इतर टीकाकार दुसरे कांही श्लोक प्रक्षिप्त मानतात, त्यामुळे त्यांच्या पाठांतील श्लोक संख्या भिन्न असते. कांही टीकांत एकाच अर्थाचे दोन श्लोक आढळतात. उदाहरणार्थ वल्लभदेव हा मल्लीनाथाहून प्राचीन टीकाकार 'त्वामासारप्रशमितवनोपप्लवं' [पाठक प्रत श्लोक १७] हा प्रसिद्ध श्लोक देऊन तसल्याच भावार्थाचा खालील श्लोक देतो—.

अध्वक्लान्तं प्रतिमुखगतं सानुमानाम्रकूटस्तुङ्गेन त्वां जलद शिरसावक्ष्यतिश्लाघमानः।
आसारेण त्वमपिशमयेस्तस्य नैदाघमग्निं सद्भावार्द्रः फलति न चिरेणोपकारो महत्सु ॥

[पुढील मजकूर पान २६२ वर पाहा]

आधुनिक पद्धतीची लघुकथा

?

श्रीपाद फडके

★

वेणीवाल्याच्या 'वेणी देऊं का ?' या प्रश्नाने त्याच्या स्मृतीस टोला दिला. खूप प्रयत्न करूनहि घड्याळ चालायला कुरकूर करते तेव्हां आपण अतिशय रागवून त्याचा लोलक जोरांत भिरकावतों ना ? वेणीवाल्याच्या भोवती आता दोनतीन जोडपीं जमलीं होतीं. 'ए? सहा आणेवाली घेऊं का ?' पतिराज आपल्या गृहणीस विचारीत होते. 'मलाहि वेणी हवी' म्हणून एक तीन वर्षांचं मूल हट्ट करीत होतें नि आईबाप त्याची समजूत घालीत होते. दोनतीन तरुणी वेणीवाल्याशी झटपट सौदा पटविण्याच्या बेतांत होत्या. एक तरुण आपल्या प्रेयसीला कुठली वेणी आवडेल याची अटकळ मनांत बांधत होता. वेणीवाला सभोंवती जमलेली संख्या लक्षांत घेऊन नेहमीच्या मानाने आज जरा जास्त फुलला होता.

त्याला हें दृष्य असह्य झालें. त्याने दुसरीकडे नजर फिरविली. समोरच्या दुकानांत दोनतीन खिश्चन मुलें नि मुली हंसत, खिदळत उभे होते. त्यांच्यापैकी कुणाला दुकानांतून कांही घ्यायचें नव्हतें. एक तरुणी नेकटाय बघत होती. दोन पोरें ख्रिस्मस् कार्डस् बघत होतीं. त्याने तेथून नजर काढली.

त्याने आपल्या सभोंवतालचें जग न्याहाळायला सुरवात केली. त्याच्या अगदी शेजारीं—जवळ जवळ त्याला चिटकूनच एक दांपत्य बसलें होतें. आगामी चिरंजीवांवर मनोराज्यें रचलीं जात होतीं. तिला भूक लागली, याची नाडी बंद पडली, तिचा प्राण गेला—एक ना दोन ! घड्याळ चालेना. लोलकाला खूप जोराने भिरकावलें......

......"एक सरोवर होतें. त्याच्यांत खूप खूप पाणी होतें. सरोवर निबिड अरण्यांत होतें. जंगलाचा एक विशेष होता. हिंस्र पशूंना तेथे वाव नव्हता. नुसतीं हरणेंच हरणें होतीं त्या अरण्यांत. सकाळीं आधीं उठायचें हरिणींनी. मग त्यांनी आळवून आपल्या प्रियकरांना उठवायचें. सर्वांनी मिळून परमेश्वराला वंदन

करायचें. स्नानादि कर्में आटोपायचीं. नंतर कंदमुळांवर यथेच्छ हात मारायचा. दुपारीं आराम करायचा. संध्याकाळीं फिरायला जायचें नि रात्रीं गुलगुल गोष्टी करायच्या. प्रणयगीतें गायचीं. हरणांनीं आपलीं डोकीं हरिणींच्या अंकावर ठेवून झोपी जायचें. असा क्रम नित्य चाले. दुःख तें कुणाला माहीत नव्हतें. विरह म्हणून कुणी ओळखत नव्हतें......

"...अेके दिवशीं शंकर गेले रानांत निघून ! तेथे भेटला त्यांना त्यांचा शिष्यसमुदाय. झालें. सांबसदाशिवच तो. रमला. घरीं परतायचो शुद्ध नाही. इकडे पार्वती विरहदुःखाने होरपळून निघत होती. तिने एक ते शंभरपर्यंत आकडे मोजून पाहिले. गणेशाला, तो झोपला असतां उगीचच अुठविलें आणि कंटाळून दणकन् पाळण्यांत टाकून दिलें. रोज असें केलें तर तो रडे. आज तोहि गुंगींत होता. पार्वती रागारागाने अंगणांत गेली. झाडाचा बुंधा धरधरून हालवला. पारिजातकाच्या फुलांचा सडा तिच्या अंगावर पडला. फुलें तिच्या गालांना, शरीराला एक सुखद स्पर्श करून खालीं पडलीं. तिने अेक ओंजळभर फुलें उचललीं. त्यांचा खूप खूप वास घेतला. आता पार्वती फुलांतील सर्व सुगंध काढून घेअील नि आपल्या वांट्याला कांहीच येणार नाही—या कल्पनेने वसुंधरा अश्रु ढाळूं लागली. झाड खदखदा हंसत होतें पार्वतीच्या त्या अवताराकडे बघून ! कुंतल अुरोजावरून खालीं पडलेले, कुंकू विस्कटलेलें, भांगातला गुलाल डोकेभर पसरलेला. नयन मेघाप्रमाणे बरसण्याच्या बेतांत. झाड हंसून हंसून रडण्याच्या बेतास आलें...

"...पार्वती पळत पळत सरोवराजवळ गेली. पार्वती वेडी झाली म्हणून हंसांत एकच गोंधळ उडाला. कमळें आपसांत कुजबुजूं लागलीं. लहरी वर माना करून पार्वतीकडे बघूं लागल्या. पार्वती लहान मुलासारखें तोंडावर पाणी उडवूं लागली. खूप खूप पाणी शिंपडलें. गालांवरून, कपाळावरून ओघळणाऱ्या पाण्याच्या थेंबाकडे ती भरलेल्या डोळ्यांनी बघत होती. थेंबांच्या अंगांतून रक्त येत होतें. पार्वतीच्या सौभाग्य चिह्नांस जखम झाली होती. तिचेंच होतें तें रक्त. पार्वतीच्या मनास शंका चाटून गेली. तिने कपाळावर हात फिरवून डोळ्यासमोर धरला. तों काय. कुंकू वाढविल्याचें तिच्या लक्षांत आलें. तिचें मन चरकलें. ती घाअीघाअीने घरांत गेली.

आरशांत स्वतःचें रूप न्याहाळलें. लगबगीने कपाळावर कुंकू लावलें. शृंगारअिच्छा उगीचच अनावर झाली. कुसुमशर तिच्या हृदयांत खोल रुतून बसला. ती कैलासावर गेली. सर्व फुलांना चुरगळलें. त्यांचा स्नेह केसांना लावला. नद्यांजवळून पैंजणें मागितलीं. भृंग्यांजवळून काजळ घेतलें. चंदनाची उटी हातापायांना लावली. शंकर चाहूल न लागूं देतां मागे येऊन उभे राहिले. पार्वतीने पुन्हा आरशांत बघितलें. आता तर तिला जास्त वाअीट वाटलें. ती

बावचळल्यासारखी झाली. तिचे ओठ थरथरत होते, बाहू फुरफुरत होते, डावा डोळा लवत होता. नेत्र दर्शनोत्सुक झाले होते. कान कुणाचा तरी आवाज ऐकण्यास टपले होते. जीभ कांहीतरी बोलण्यास उत्सुक झाली होती. सर्व अवयव कुणाचें तरी स्वागत करण्यास उतावीळ झाले होते. तिने दुःखातिशयाने डोळे झाकले.

शंकरांनी परीक्षा बघण्याचें ठरविलें होतें. पण त्यांना पार्वतीच्या सौंदर्याने, शृंगाराने, विरह दुःखाने लाली चढलेल्या आरक्त कपोलांनी आकर्षिलें. त्यांनी पाय न वाजवतां पार्वतीचे डोळे झाकले. पार्वतीने हाताबरूनच ओळखलें. तिनेहि आज रुसण्याचें ठरविलें होतें. भावनावेग असीम झाला. तिचा देह शंकराच्या खांद्यावर पडला. तिची हार झाली तिच्या अवयवांना पान्हा आला होता....

..."रात्रीं शंकरांनी सर्व सर्व पार्वतीला सांगितलें.—'खरंच सांग सखे, मी दिवसभर तुझ्याजवळ—अगदी जवळ असतों तर तूं या रात्रीं – यावेळी मला अशी बिलगली असती कां?' पार्वती लाजली. बोलली नाही. हट्टीपणाचें बाळकडू प्यायलेली ती. विरहांतलें सुख तिला पटेना. शंकराने तिला हरिणांच्या जंगलाची हकीगत सांगितली. तिला त्यांतून हिंडवून आणलें. पार्वतीला जिकडे तिकडे समाधान बघून मोठा आनंद झाला. 'सखे तूं बघितलंस त्यानं हुरळून जाऊं नकोस. सुख कशांत असतं आता तुला दाखवितों.'

...."सरोवरांतलें पाणी आटलें. वाघ, सिंह, हिंस्र पशु आले तेथे वस्तीला. चारदोन शिकारीहि येऊं लागले तीरबाण घेऊन. आपसांत कलह उत्पन्न झाला. हरिणांना आपलें जीवीत धोक्यांत आहे याची जाणीव झाली. पण त्याचा बुद्धिभ्रंश झाला होता. समजत होतें–उमजत नव्हतें. कानापर्यंत येत होतें–आंत जात नव्हतें. डोळ्याला दिसत होतें–प्रतिबिंबित होत नव्हतें. वस्तुस्थितीचें आकलन होत होतें पण कारण लक्षांत येत नव्हतें.

..."हळूहळू हरिणांची पांगापांग होऊं लागली त्या जंगलांतून. अकच जोडपें राहिलें शेवटीं. रानांतली हिरवळ म्हातारी झाली. झरे रोडावले. दुरून हिरवें गवत दिसावें. जवळ गेलें की एखादा हिरवा सर्प झोपलेला दिसावा. दुरून दिवे दिसावे. त्या रोखानं निघालं तर ते दीप हालावे. त्याच्या भोंवतीं काळ्या पिवळ्या पट्ट्यांचं शरीर दिसावं. धावून धावून दमलीं तीं बिचारीं दोघं. तो तिच्या डोळ्यांतलीं आसवें बघे. ती त्याच्या डोळ्यांतली आसवें बघे. आपआपल्या डोळ्यांत प्रत्येकास दुसराच दिसे. शेवटीं एक डबकें दिसलें. पाण्याचा एक थेंब नाही त्यांत. नुसता चिखल. एक दोन कमळें नाही म्हटलें तर डुलत होतीं. तिने कमळ तोडलें. तो रागावला. एवढ्या सुंदर फुलाला कां

तोडलें? तो हसला. तिने त्याच्या देठांतलें पाणी त्याला पाजूं लागतांच तो

उमजायचें तें उमजला. त्यानें मी नाही पिणार म्हणून सांगितलें. ती म्हणाली 'मी पण नाही पिणार. झालें. देठ वाळून गेलें...

..."ती अशीच पुढे गेली. एक नारळाच्या करवंटींत पाणी होतें. एकापुरतें. तो तिला म्हणे—तूं पी! ती म्हणे—तूं पी! दोघेंहि प्यायलीं नाही. दोघांचीं मनं प्रेमामृत प्राशून भरलीं होतीं. तिचे पाय लटपटूं लागले. तिचा झोक गेला. त्याने नरोटी उचलली. तिच्या तोंडाजवळ नेतांच ती म्हणाली— 'मी तर जातेंच आहे! तुम्हीतरी प्या. जगाल. मला विसरून जा.' पण तोहि पक्का. झालें. नरोटींत पाणी तसेंच पडून राहिलें. ती स्वर्गांत जाऊन लपली प्रणय लपंडाव खेळतां खेळतां आणि तो निघाला तिला शोधायला. दोघाहि हरणांना स्वर्गपद प्राप्त झालें"......

......"शंकरानं मिस्किलपणं पार्वतीकडे पाहिलें. तिच्या मुखाची व्याख्या निराळी होती. तिला शंकराचें हें कृत्य आवडलें नाही. पुढे काय झालें कुणास ठाऊक. सर्व देव, दैत्य, मानव, पशु, पक्षी प्रणयाराधनेंत गुंग झाले"......

त्याने समोरच्या भिंतीकडे बघितलें तेथेंहि तेंच. राधाकृष्ण झोपाळ्यावर बसून कानगोष्टी करीत होते. झोपाळा अंग चोरून त्यांचें संभाषण ऐकत होता. कलिका भृंगाला तें दृश्य दाखवीत होती. चित्रांतली राधा, कृष्ण; मोर, लांडोर; चिमणा, चिमणी; कलिका, भृंग; चंद्र, चकोर; वसुंधरा, अंबर सर्व सर्व आपल्याकडे बघून मिस्किलपणे हंसत आहेत असें त्यास वाटलें. लांब लांब जिभा काढून ते वेडावीत आहेत असें त्यास वाटलें. गुलगुल गोष्टी करून आपली निर्भत्सना करीत आहेत असें त्याला वाटलें.

त्याला आठवण झाली. तो हॉटेलांतून बाहेर पडला. चौपाटीवर तो धावत धावत गेला. तेथल्या वाळूवर पसरला. त्याने सागराकडे नजर फेकली. समुद्र शांत होता. त्याच्या झुळझुळ वाहणाऱ्या लाटा वाळूचीं चुंबनें घेत होत्या. दूरवर आकाश धरित्रीला आपल्या बाहुपाशांत बद्ध करून टाकण्यास उत्सुक झालें होतें. संध्या रुसली होती. अंशुमाली तिला आळवीत होता. तिचे कपोल आरक्त झाले. अंशुमालीस तिच्या रश्मींच्या मादक सुगंधाने वेड लावलें. ती लाजेने गिरिकंदरांत पळून गेली. अंशुमालीहि तिच्या मागोमाग गेला. मोठा भाऊ घरांतून बाहेर पडला आणि धाकटा भाऊ लपतछपत चांदणीला घेऊन अंबरीं आला. तिच्याशी तो शिवाशिवी खेळूं लागला. घटकेंत चांदणी मेघाआड लपे. चंद्र तिला शोधी. कधी चंद्र दडे—चांदणीवर राज्य येई.

त्याने हात डोळ्याजवळ नेले. नेत्र झिरपत होते. आपल्या मालकाची अवस्था बघून दुःखातिशयाने त्यांना भडभडून आलें. ते पाणावले. डोळे

रडतात म्हणून त्यांचा मालकहि रडूं लागला. उगीचच आपल्या गालांवर कुणीतरी हात फिरवत आहे असें त्यास वाटलें. त्याने डोळे उघडून बघितलें. वाळूचे चिमुकले कण त्याच्या गालांना अविरत चुंबीत होते. वाळू त्याला आपल्या कल्पनाजगतांतली सहचारिणी वाटूं लागली. तो बेभान झाला. तो धुंद झाला. त्याचें हृदय हरवलें. आनंदोन्मादाने उचंबळून त्याने अधर वाळूवर टेकले. तो उठला. त्याने कपडे झाडले.

समोरच्या स्मशानाकडे त्याची दृष्टि गेली. कुणीतरी एका पार्थीव शरीरास शून्यांत विलीन करण्याच्या खटपटींत होते. अग्नी आपल्या सहस्र जिव्हांनी भक्ष्यावर मिटक्या मारून ताव मारीत होता. चार माणसें भोंवतालीं जमलीं होतीं. मासळीच्या एक प्रकारच्या विशिष्ट वासाने गुदमरल्यासारखें होत होतें. रातकिडे आनंदाने बेहोश होऊन गात होते. दूर कुठंतरी कुत्रे केंकाटत होतें. चौपाटीवर सामसूम झाली होती. तरी देखील प्रणयालापांतून उठणारे हास्याचे फवारे, येणाऱ्या जाणाऱ्याला चित करून टाकत होते. जवळचा थोरला वृक्ष हें बघत होता. समुद्राचें पाणी हळूहळू वाढत होतें.

तो उठला. पूर्वीच्याच हॉटेलांत जाऊन बसला. भिंतींनी त्याचें स्वागत केलें. मघाच्या तसविरींतल्या कृष्णाच्या ऐवजी त्यास स्वतःची प्रतिमा दिसूं लागली. चित्रांतल्या राधिकेच्या जागीं त्यास वाळूच वाळू दिसत होती. त्याने ओठावरून जीभ फिरविली. पाणी मागितलें.

त्याचें लक्ष सहज समोरच्या भिंतीवरील पालींकडे गेलें. दिव्याच्या भरपूर उजेडात नुकत्याच येऊन गेलेल्या पावसाच्या सरींने त्यांना पर्वणी आल्यागत वाटत होतें. चुकचुक आवाज करून त्या आपला आनंद जाहीर करीत होत्या. कीटक दिव्यांकडे झेप घेत होते. त्यांतले कांही दिव्यांशी झुंज घेत. खाली पडत, कोसळून जमिनीवर येण्यापूर्वीच पुन्हा उडूं लागत—पाय धरून वर फेकून दिलेलें कबूतर वरच्यावर जसें हवेवर झेप घेतें तसें! कांही कीटक भिंतीवर बसून कधीच न येणाऱ्याची प्रतीक्षा करत होते. पाली कीटकांना पकडायच्या प्रयत्नांत होत्या. कीटक त्यांना चकवत होते. अगदी तोंडांत आल्यागत वाटत व निसटत.

दहा मिनिटांच्या सतत झुंजेनंतर त्यांतल्या एका पालीच्या हातीं एक कीटक सापडला एवढ्यावेळ मित्रवत् वाटणारी दुसरी पाल तिच्यावर चालून गेली. पहिलीहि प्रेमसंबंध विसरून स्वभक्षरक्षणार्थ सज्ज झाली. हेंच तें यज्ञकर्म! तो निरखून बघूं लागला. त्याला कीटकाची कींव येत होती. कीटक न मिळाल्याने पाल उपाशी राहील याची काय वाट हें त्याला कळत नव्हतें! भांडणांतून निघणाऱ्या निष्पन्नाच्या अनुकूलतेवर विश्वास टाकून त्याने दृष्टि रोखली. पहिलीसहि
२४१ कीटक मिळाला नाही व दुसरीस त्याला गिळंकृत करतां आलें नाही. तिसऱ्या

पालींने धरण्यापेक्षा मरण पत्करलें या निश्चयाने कीटकाने या जगांतून पोबारा केला होता.

पालींनी आक्रमण करावें–कीटकांना प्रतिकार करतां येऊं नये. एकीचें बळच खोटें. सर्व कीटक मिळून का पालींचें पारिपत्य करूं शकतील ? सर्व तारका मिळून चंद्राचें अस्तित्व नामशेष करतील ? छे ! छे ! त्याचें डोकें सुन्न झालें. मन बधीर झालें.

भिंतीवरील घड्याळ बंद पडलें म्हणजे त्याला लावण्याकरितां काटे मागच्या सर्व आकड्यांवरून एकदा फिरवावे लागतात. तो उठला. रात्र बरीच झाली होती. त्याने खिसे चाचपले. सुटे पैसे नव्हते. त्याने नोट तोडविली. त्याला वेणी विकत घ्यायची होती. वेणीवाल्याचा तपास करीत तो भटकूं लागला. एकीच्या हातांत याला वेणी दिसली. पळतच तो तिच्याजवळ गेला. तिच्या बरोबरच्या माणसाने गुरकावतांच सरळ मागोमाग लागला. रस्त्यावर पडलेलें कागदाचें मेंडोळें त्याने वेणी म्हणून उचललें. दुकानांतल्या लडीस वेणी समजून त्याने सौदा केला. समोरच्या वेणीवाल्याचें दुकान उघडें दिसलें.

तो पळत पळत तीरासारखा गेला. दुकानांतल्या सर्व वेण्या संपून गेल्या होत्या. दुकानदार पैसे मोजत होता. याने त्यास गदागदा हलविलें. वेणी मिळाली नाही. फूल गवसलें नाही. फुलांच्या टोपलीला उटली मुलटी करून बघितलें. तींत एकहि फूल नव्हतें. दोन चार पाण्याचे थेंब तिच्यांतून ओघळत होते. त्याच्या जिभेवर कुणीतरी वेण्याचा ढीग आणून टाकला आहे असें त्यास वाटलें. त्या सर्व भरभर खाऊन टाकण्याच्या इराद्यानें त्याने मिटक्या मारल्या. फुलांचा सुवास घेत दोन थेंब त्या मिटक्यांतून कुठे पळाले, तोंडालाहि कळलें नाही.

त्याला फुलवाल्यांचीं दुकानें ठाऊक होतीं. तो तिथे गेला. दुकानें बंद झालीं होतीं. त्यानें दाणदाण करून दारें फोडलीं. दिवे लावले. सर्व कोपरे धुंडाळले वेण्या मिळाल्या नाहीत. त्याने चार दुकानें फोडलीं. सर्व टोपल्या रस्त्यावर भिरकावल्या. सर्व बादल्यांतलें सुगंधित पाणी अंगावर भराभर ओतून घेतलें. ओलाचिंब झाला तो.

मोडतोडीचा आवाज ऐकून शिपाई आले. त्यानी त्याला अटक केली. चोरीचें कारण विचारलें. कोर्ट झालें–कचेरी झाली. याचा एकच जाब–" वेणी फुलं ". साक्ष ऐकायला आलेल्या रात्रीचा माळी होता. त्याने रात्रीचा अनुभव सांगितला. हा गृहस्थ वेणी न मिळाल्याने वेडा झाला आहे असें तो म्हणाला. डॉक्टरांनी तपासणी केली. वेडा नाही. वाताचा झटका आला असेल. सुटका झाली.

घरीं आला. पलंगावर अंग टाकलें. "वेणी देऊं कां ?" खाली वेणीवाला कुणाला तरी विचारत होता. याचें मन यालाहि 'एक वेणी घे' असें म्हणत होतें. तो उठला नाही. त्याच्या पापण्यांवर तसल्याच स्थितींत कुणीतरी येऊन

बसलें. 'कोण ?' म्हणून त्याने तीनदा विचारलें. हात लावून बघितला. भासलें पण दिसलें नाही. चाहुल लागली–स्पर्श जाणवला नाही.

नेत्रांतला एकेक अश्रु फूल बनून दुसऱ्याचा हात धरत आहे. फुलाला फूल जोडलें गेलें. एक सुंदर वेणी तयार झाली. पण या वेणींतलीं फुलें एका दोऱ्याच्या तुकड्याने एकमेकांना बिलगली नव्हतीं. प्रत्येकाने आपल्या प्रेमसंबंधाने दुसऱ्यास आवळून धरलें होतें. हळूहळू तीं फुलें त्याच्या डोक्यावर आलीं. त्याला कांही दिसेना. त्याने डोळे उघडले. फुलें लाजलीं. अश्रूंत जाऊन लपलीं. त्याला गंमत वाटली. त्याने त्यांना न कळूं देतां हळूच आसवें हातांत घेतलीं. त्यांना चुरगळलें. पण फुलें बाहेर येण्याचें लक्षण दिसेना. त्याचें लक्ष टेबलावरच्या फ्रेमकडे गेलें. तिच्या काळ्याभोर अंबाड्यावर याच्या हातांतल्या अश्रूंतून निसटून गेलेलीं फुलें बसलीं होतीं.

खाली वेणीवाला ओरडून कुणाला तरी विचारीत होता–"वेणी देऊं का ?" या प्रश्नाने त्याच्या स्मृतीस टोला दिला नाही. स्मृतीस दुसऱ्या टोल्याची आवश्यकता नव्हती. घड्याळाच्या चालू लोलकाला थोडीच कुणी टोला देतें ?

सखे, तुझी गोड स्मृति

१

सखे, आज दूर तुझा—
माझ्या पासून निवास !
सहवासाचा गे ध्यास—
माझ्या जडला जिवास !

२

केव्हा ? कोठुनी ? कळेना—
लागे जीवा हुरहूर !
एकाकी हा आळवितों—
कुणा हृदयींचा सूर ?

३

क्षण वाटे भोंती दाटे—
अवसेची घोर रात !
कोण एकाकी नाचवी—
चकोरा या चांदण्यांत ?

४

कसा हृदय-कुंजाते—
जाई शिशिर सोडून !
आणि अवचित होई—
वसंताचें आगमन !

५

एक सारखीच आस—
माझ्या हृदय-समुद्रा !
कधी पाहीन फिरुनी—
तुझ्या मधु मुख-चंद्रा !

६

सखे, तुझी गोड स्मृति—
घाली भुरळ जिवास !
आणि कसा मी विसरें—
आपलाच आपणांस !

—प्रभाकर देव

अनुक्रमणिका

नागपूर वऱ्हाडांतील वाङ्मय विषयक जागृतीचें अल्प समालोचन

★

कै. नी. ब. उर्फ बापूसाहेब भवाळकर

जन्म २१-५-१८७६ मृत्यू २४-११-१९४२

नागपूर येथील मागील पिढींतील सुप्रसिद्ध साहित्यिक व संशोधक कै. बापूसाहेब भवाळकर यांचा "नागपूर–वऱ्हाडांतील वाङ्मयविषयक जागृतीचें अल्प समालोचन" या शीर्षकाचा लेख पुरवणीसह येथे दिला आहे. बापूसाहेबांना वाङ्मय व इतिहास यांच्या संशोधनाविषयीं अत्यंत कळकळ होती. त्यांनी स्वतः या विषयांत उत्तम संशोधन केलेंच परंतु या प्रांतांतील तरुणांना त्यांत गोडी लागून त्यांच्या हातून भरीव कार्य व्हावें याकरितां संशोधनमंडळ स्थापण्याचेहि अनेकदां प्रयत्न केले. त्यापैकीं एक प्रयत्न सुमारे पंचवीस वर्षांपूर्वीं त्यांनीं केलेला माझ्या स्मरणांत अद्यापि ताजा आहे. त्या मंडळाच्या पहिल्याच सभेंत बापूसाहेबांनीं हा लेख वाचला होता असें आठवतें. त्यांच्या इतर लेखांप्रमाणेंच यांतहि अत्यंत दुर्मिळ अशी माहिती मोठ्या परिश्रमानें जमवून दिलेली आढळते. लेखाच्या परिशिष्टांत या प्रांताविषयीं ज्या इंग्रज गृहस्थांनीं लिहिलें आहे त्यांचीहि माहिती संक्षेपानें दिली आहे. असा महत्त्वपूर्ण लेख प्रसिद्धीस दिल्याबद्दल कै बापूसाहेबांचे चिरंजीव श्री. गजाननराव भवाळकर यांचे आभार मानले पाहिजेत.

—वा. वि. मिराशी

या भारतवर्षांत आर्यांचे आवर्त आसमुद्रान्त चोहोंबाजूंनी खेळत असता अनेक शतकें ज्या मध्यवर्ती प्रदेशास "महाकान्तार" "दंडकारण्य" या नांवाने ओळखीत असत, त्या प्रांतास हल्लीं मध्यप्रांत व वऱ्हाड असें म्हणतात. शिकाऱ्यांनी त्रस्त केलेलीं वन्य श्वापदें जशीं प्राचीन काळीं या प्रदेशाच्या मायपोटांत आश्रयास येत, त्याचप्रमाणे शत्रूंनी पाठलाग पुरविलेलीं अनेक राजकुळें मध्ययुगांत याच प्रदेशांत अज्ञातवासांत काळ कंठीत असत; आणि आपल्यांशी समानदुःखी अशा गोंडादि वन्य समाजांत सुखाने कालक्रमणा करीत. राजकीय, सामाजिक अगर धार्मिक उलाढाली व कांत्या बाहेर देशांत चालल्या असता हा प्रांत

नित्याप्रमाणेंच मितमित असे, व त्याला रघुवंशांतील "सुतमीनह्रद"ची उपमा अत्यंत समर्पक रितीनें शोभत असे. अशा या प्रांतावर प्राचीन काळीं जों गोंडलोकांचीं अधिराज्यें स्थापन झालीं होती, त्यांचा इतिहास फारसा उपलब्ध नाही, व तो तसा उपलब्ध झाला तरी त्यांत फारसे रोमहर्षण प्रसंगहि आढळण्याचा संभव नाही. अर्वाचीन काळांतील जी पहिली राजकीय वक्रदृष्टी सुमारे तीन साडेतीन शतकांपूर्वी या प्रांतावर पडली, ती मोंगलांची होती; त्यांतहि त्यांचा हेतू फक्त या प्रांतांतील गोंड राजांनी मोंगलांचें सार्वभौमत्व मान्य करावें, इतकाच होता. नंतर लवकरच साताऱ्याच्या शाहूमहाराजांच्या पदरीं असणाऱ्या परसोजी भोंसल्यास मुलुखगिरी करण्याचें प्रोत्साहन मिळून त्याची जेव्हा वऱ्हाडांत चौथाई सरदेशमुखी व घांसदाणा वसूल करण्याच्या कामावर योजना झाली तेव्हां त्याच्या, व एकेकाळीं त्याने दत्तक म्हणून नियुक्त केलेला, पण पुढे औरस पुत्र झाल्यामुळे तो बेत रहित केल्यामुळे मनांत खट्टू झालेला जो रघुजी—यांच्या महत्वाकांक्षी दूरदृष्टीस या प्रांतांत आपला उत्कर्ष साधण्याची व नशीब काढण्याची भावी बीजें आढळलीं; व प्रसंगानुसार त्या राजकीय बीजांचा फायदा घेऊन रघुजींने मोठ्या शहाणपणाने व मुत्सद्दीगिरीने येथील गोंड राज्यांत आपलें वर्चस्व स्थापिलें.* त्या नंतरचा इतिहास सर्वांच्या माहितीचा आहे.

या प्रांतांतील संशोधनाची थोडीशी रूपरेखा देऊन गेल्या १०० वर्षांत येथे योगक्षेमाच्या निमित्याने येणाऱ्या अगर स्थायिक होणाऱ्या बुद्धिमान पुरुषांनी या प्रांतांत जें थोडे फार सारस्वत कार्य केलें त्याची उपलब्ध झालेली माहिती देण्याचा मनोदय आहे. या प्रांतांत भोंसल्यांच्या राजवटींत अनेक पंडित शास्त्री लोकांस आश्रय मिळे, व त्यांच्या हातून कांहीं साहित्यसेवा घडली आहे हें हि पुढे दिलेल्या वृत्तांतावरून लक्ष्यांत येईल; परंतु आजकाल ज्याला पुराणसंशोधन म्हणतात, तसें संशोधन येथे साधारणतः जेन्कीन्स साहेबांच्या रेसिडेन्सी अंमलापूर्वी झाल्याचा दाखला मिळत नाही. त्यांनी भोंसल्यांच्या राज्यव्यवस्थेवर लिहिलेले रिपोर्ट अद्यापिहि बहुमूल्य माहितीने भरलेले आहेत, व या सामुग्रीचा उपयोग इतिहासकांस अजूनहि उद्बोधक होईल अशी खात्री आहे. सर रिचर्ड जेन्किन्स हे श्रीरामपुरचे प्रख्यात मिशनरी डॉ० केरी यांच्या तालिमींत तयार झाले होते, व लॉर्ड कॉर्नवालीस साहेबांजवळ यांचें वजन मौंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनांच्या बरोबरीचें होतें. डॉ. केरीसाहेबांचे हे पट्टशिष्य असल्यामुळे यांनी आपल्या रेसिडेंटी काळांत तिकडील मिशनरी चळवळीस मदत केली, व नागपूर प्रांतांत असलेल्या छत्तीसगड व कामठी येथील इंग्रजी लष्करांतील कित्येक अंमलदारांस त्यांनी येशूख्रिस्ताचें शुभवर्तमान लष्करांतील एतद्देशीय शिपायांस सांगण्याची परवानगी दिली. त्या निमित्ताने येथे डॉ. केरी यानी मराठींत भाषांतर केलेल्या बायबलाचा प्रवेश सदर शिपायांत सन १८१७ च्या आसपास झाला. हें बायबल डॉक्टर-साहेबांनी कलकत्यास असलेल्या कोणा "वैजनाथ शर्मा" पासून मराठींत "नागपुरी"

* "The Seige of Sitaburdi" a report submitted to the government in 1816-18.

भाषेंत केलें होतें.* सदर भाषांतराचें काम १८०३ पासून सुरू होतें;व हा वैजनाथ शर्मा भोसले सरकारच्या कलकत्याच्या वकालतींत असलेल्या आश्रितवर्गापैकी कोणी असावा, असा तर्क केल्यास चुकीचें होणार नाही. या प्रांतांत प्रथमतः प्रविष्ट झालेला, व या प्रांतांत प्रचलित असलेल्या मराठी भाषेंत आणि कदाचित या प्रांतांतील रहिवाशी पंडिताने लिहिलेला, म्हणून या मराठी बायबलाचा येथें उल्लेख करण्यांत आला आहे.

यानंतरचा काळ म्हणजे इंग्रज सरकारच्या रेसिडेंटाच्या सल्लामसलतीनें भोसल्यानी आपला राज्यशकट चालविला तो काळ होता. १८१८ मध्यें तिसरे रघुजी गादीवर आले; ते अल्पवयी असल्यामुळे १८२६ पर्यंत सर्व कारभार रेसिडेंटाच्या सल्ल्याने गुजाबादादासाहेब गुजर पहात असत. अखत्यार मिळण्याच्या वेळेस त्यांचा इंग्रजांशी तह झाला, त्यामुळे कंपनीसरकारचा प्रवेश राज्यव्यवस्थेंत अधिक दृढ झाला व दोन पलटणी नागपूरजवळ ठेवाव्या व उरलेलें इंग्रजी सैन्य नर्मदेच्या दक्षिण तटाशी असावें, अशी व्यवस्था भोंसल्यास कबूल करावी लागली. या सैन्यावरील एक अधिकारी कर्नल मॉक्सन, यांनी डॉ. केरीसाहेबांपासून हिंदी व मराठी बायबलांच्या प्रती मिळवून त्यांचा देशी सैन्यांत प्रसार केला हें मागेच सांगितलें आहे. कामठी येथे असलेल्या पलटणींवरील दुसरे अधिकारी सर डोनल्ड म्याकलिअड व सरविल्यम हिल यानी हें शुभवर्तमान प्रसारकाचें काम १८४५ मध्यें रेस्टिफन हिस्लॉपसाहेब नागपुरास मिशन स्थापन करण्यास येईपर्यंत चालविलें. मॉक्सन साहेबानी दीक्षा दिलेल्या पैकू नांवाच्या एका खिस्ती गोंडाने बायबलाचें गोंडी भाषेंत भाषांतर केलें होतें, असा एक उल्लेख आढळतो;* पण तें प्रसिद्ध झालें किंवा हस्तलिखितच गहाळ झालें याची माहिती नाही. जेन्किन्स साहेबासाठी विनायक आनंदराव औरंगाबादकर यानी एक भोसल्यांची बखर लिहिली असाही एक उल्लेख सांपडतो; पण त्याचें साल शके १७३८ (१८१६) दिलें आहे व जेन्किन्स नागपुरास १८१८ मध्यें रेसिडेंट झाले, यावरून या आख्यायिकेचा खरेपणा प्रत्यक्ष ग्रंथ पाहण्यास मिळाला तरच सिद्ध होईल.

यानंतरचा अप्रसिद्ध असा दुसरा ग्रंथ १८३९ सालचा होय. पुण्यास १८३७–३८ मध्यें विधवा पुनर्विवाहाच्या शास्त्राशास्त्रतेबद्दल चर्चा झाली तेव्हा त्या वेळचे नागपूरचे रेसिडेंट मेजर एल्‌·वुइलकिन्सन यांनी सदर विषयावर नागपूरच्या भरंवशीक गृहस्थाचे पदरचा मनुष्य'' या अनमिक गृहस्थाकडून एक ग्रंथ लिहवून त्याला इंग्रजी प्रस्तावना लिहून १८३९ + मध्यें तो छापून प्रसिद्ध केला. हा ग्रंथ अद्यापि उपलब्ध झाला नाही.

तिसरे रघुजी व नंतरचे जानोजीरावसाहेब भोंसले यांच्या काळांत नागपूरच्या दरबारांत शास्त्री पंडितलोकांस मोठी मानमान्यता होती, व त्यांच्या पदरीं पुष्कळ विद्वानांचा समूह होता. बापूसाहेब भोंसले यांच्या पदरी वीरराघवाचार्य चंद्रपूरकर व आप्पासाहेब भोंसल्यांच्या आश्रयास कृष्णशास्त्री रामानुज असे

* "नवयुग" नव्हें,१९१३ व जानेवारी व फे.१९१४ + पुनर्विवाहशास्त्र पृ. १०६

दान पंडित असत. यांच्यांत श्रेष्ठ कोण याबद्दल परीक्षा करण्यासाठी म्हणून काशीच्या पंडितांतर्फे कोणी विद्वान शास्त्री पाठवावा अशी विनंती राजेसाहेबांतर्फे केल्यावरून काशीच्या पंडितांनी या कामावर प्रसिद्ध वैय्याकरणकेसरी सदाशिव-शास्त्री धुळे यांची योजना करून त्यांनी नागपुरास पाठविलें. त्यांच्यासमोर सभा भरून या दोघां पंडितांचा २१ दिवस वादविवाद झाला; तरी कोणीहि पराजित होण्याचा रंग दिसेना, तेव्हां दोघेहि तुल्यबळ महापंडित आहेत असा सदाशिवशास्त्र्यांनी निवाडा दिल्यावर राजांनी सभा विसर्जन करून दोघांचा सत्कार केला, व सदाशिवरावशास्त्र्यांस गांव जहागीर करून त्यांना नागपुरास स्थायिक होण्याची विनंती केली. सदाशिवशास्त्र्यांचा जन्म १७८१ मध्यें झाला; ते प्राणनाथाचार्यांजवळ व्याकरण पढले. अमृतरावसाहेब पेशव्यांचे पंडित गंगाधरशास्त्री गाडगीळ याना वादांत पराजित केल्यावरून त्यांना पेशव्यांनी "वैय्याकरण केसरी" ही बुद्धीमानाची पदवी दिली होती. ज्योतिष, व्याकरण, धर्मशास्त्र, न्याय अलंकार हीं पांच शास्त्रें त्यांना उत्तम अवगत होतीं. यांनीं परिभाषेन्दु शेखरावर 'सदाशिवभट्टी' नामक एक संस्कृत टीका केली असून "पतितोद्धारमीमांसा" नांवाचा दुसरा एक ग्रंथ यांनी केला आहे, असें समजते. १८४५ मध्यें बाजीरावसाहेबांच्या कारकीर्दीत नागपुरांत 'कलंकी' प्रकरण उत्पन्न होऊन पुष्कळ ब्राह्मण कुटुंबें अपंक्त झालीं, तेव्हां त्यांना पुन्हा पावन करून घ्यावें अशी राजांस इच्छा झाली व त्यानी त्यांना शुद्ध करावें असा हुकुमही सोडला; पण काशीहून याबाबतीत अखेरचा निकाल आला नव्हता व धुळेशास्त्र्यांच्या अभिप्रायावर तें प्रकरण थबकून होतें. राजांस शास्त्रीबोवांच्या स्पष्टवक्तेपणाचा मोठा जरब वाटत असे, पण दरबारांत प्रश्न निघून निरुपायाने त्यांना शास्त्रीबुवांचें मत घेणें प्राप्त झालें. तेव्हां असें सांगतात कीं शास्त्रीबोवांनी राजास जवाब दिला की "मी येथे नागपुरांत आहे तोपर्यंत तरी यांची शुद्धी होणें नाही, तरी आपल्या मर्जीनुरूप करून मला दिलेली आपली जाहागीर परत घेऊन काशीस परत जाण्याचा निरोप मिळावा." यावर शास्त्रीबुवांस शांत करून तें प्रकरण तसेंच निकालांत काढण्यांत आलें. शास्त्रीबुवा इ. स. १८५४ मध्यें वारले. सीतारामशास्त्री केळवदकर हे बाजीरावसाहेबांच्या खास सरकार अदालतींत न्यायाधीश होते. यांच्यावर मुधोजींची कृपा होऊन त्यांच्या मदतीने काशीस राहिले व तेथे चंद्रनारायण भट्टाचार्य जवळ न्याय, जगन्नाथशास्त्री गाडगीळांजवळ व्याकरण व दुसऱ्या एका महानुभाव स्वामीजवळ उत्तर मीमांसा पढले. विद्या पूर्ण झाल्यावर अमृतरावसाहेब पेशव्यांनी चित्रकूटीं पंडितसभा भरवून तेथे लक्ष्मणशास्त्री चवधरी व सीतारामशास्त्री यांचा न्यायशास्त्रांत अकरा दिवस वाद झाल्यावर दोघांस बहुमान पुरःसर पेशव्यांनी संतुष्ट केलें. सीतारामशास्त्री बखरे हे मुधोजीचे पुराणिक होते; व गंगाधरशास्त्री मंगरूळकर हे बाळासाहेब भोंसल्यांच्या पदरीं आश्रयास असत. गंगाधरशास्त्र्यांनी संस्कृतांत व प्राकृतांत बरीच रचना केली. १८६५ मध्ये त्यांनीं जानोजी साहेबांच्या आज्ञेवरून "संगीत राघव" नामक संस्कृत काव्य गीत गोविंदाचे धर्तीवर रचिलें. या शिवाय "रामप्रमोद काव्य"

" शतश्लोकी देवीस्तोत्र ", " चित्रमंजूषा ", " विलासगुच्छ ", " राधाविनोद " वगैरे संस्कृत आणि "रसकल्लोळ", " मनीषापंचक भाषांतर ", "भामाविलास", " रसमंजरी ", "कुवलयानंद" वगैरे प्राकृत काव्यग्रंथ व कांही आख्यानें रचिलीं. हे १८६९ मध्यें वारले.

या काळांत या प्रांतांत बरेच सत्पुरुषहि झाले; त्यांत गिरडचे रामकृष्ण-बाबा ब्रह्मचारी व आंभोऱ्याचे काशिनाथबाबाब्रह्मचारी हे मुख्य होत. परंतु ज्यांचे नांव आबालवृद्धांस प्रिय झाले होते, असे प्रख्यात सत्पुरुष कृष्णानंद दादाजी साधू हे होत. यांचा जन्म १८१९ मध्यें झाला, व ते आपले वडील मुकुंदराज यांच्या देखरेखीखालीं जमाखर्ची लिहिणें शिकून भोंसल्यांच्या शिलेखान्यांत नोकर झाले. मुकुंदराज हे विरक्तवृत्तीचे पुरुष होते व " विष्णुरस " नांवाचा एक वेदांतपर ओंवीबद्ध ग्रंथ त्यांनीं केला आहे असें समजतें. यांनी आपल्या मुलाचें मन काव्यादिकांत रमत चाललें आहे व ते नऱ्होबादिक्षीत व रामशास्त्री खरे यांच्यापाशीं काव्य-नाटक-चंपू वाचण्यांत मग्न असतात, असें पाहून त्यांना देवापुढें भागवत वाचावें असें सुचविलें, व पुढेपुढे दर एकादशीस कीर्तनहि करण्याची आज्ञा केली. दादाजींनी अशा प्रसंगासाठीं निवडक आख्यानें तयार केलीं व प्राकृत कविता करून तीं आपले बंधु आत्मारामबापू यांच्या गोड सार्थीत म्हणावीं. यांच्या काव्यांत प्रसाद व रस असे व त्याची पैठण काशीपर्यंत प्रशंसा होऊन पुष्कळ मानधन मिळालें. हे १८८९ मध्यें वारले.

या नंतरच्या पिढींत म्हणजे इंग्रजांनी राज्य खालसा केल्यानंतर येथे जी नवी पिढी तयार झाली, तिच्या वाङ्मयोपासनेचा इतिहास असाच मनोरंजक व उत्साहदायक आहे. नागपुरांत पहिली इंग्रजी शाळा १८४६ मध्यें स्टिफन हिस्लॉपसाहेबांनी शहरांत शुक्रवारींत भरबाजारपेठेंत काढली.* तिचाच विस्तार होत होत १८५६ मध्यें ७०० विद्यार्थी तेथे शिकूं लागले व या संस्थेने आपली स्वतःची इमारत बांधली. पुढे त्याचें हिस्लॉप कॉलेज होऊन तेथे कलकत्ता विश्वविद्यालयांतील अभ्यासक्रम सुरूं झाला. स्टीफन हिस्लाप हे भोंसल्यांच्या राजवटींत नागपुरास धर्मोपदेशक म्हणून आले हें मागें सांगितलें आहे. यांनां शास्त्रीय संशोधनाचा नाद होता, व या प्रांतांतील वनस्पती व भूगर्भशास्त्रीय बहुमूल्य माहिती व शोधनें व नमूनें यांनी वेळोवेळीं गोळा करून प्रांतांतील खनिजसंपत्तीचें महत्त्व प्रसिद्ध केलें. हिंदुस्थान विषयक भूगर्भविद्येचा पाया यांच्या संशोधनामुळे दृढमूल झाला व हिंदुस्थानची भू–रचना इतिहास पूर्वकाळीं कशी निर्माण झाली, व त्याला अंदाजें किती कालावधि लागला असावा, याबद्दल जो भूगर्भस्थ पाषाणादिकांचा व प्रस्तरमय झालेल्या प्राण्यांच्या व वनस्पतींच्या अवशेषांचा पुरावा मिळाला, त्यांत हिस्लॉपसाहेबांची कामगिरी अत्यंत महत्त्वाची झाली आहे. या बद्दल बरीच सविस्तर माहिती देण्यासारखी आहे व ती आमच्या होतकरू उपासकांस अत्यंत उद्बोधक होईल अशी खात्री आहे. हे साहेब टाकळघाटीं १८६३ मध्यें तेथील नदीच्या आकस्मिक पूरामध्यें

* Life of Hislop p. 65, 137.

रात्रीं अपघाताने मृत्यु पावले. सर रिचर्ड टेंपलसाहेबांनीं यांचे लेख प्रसिद्ध केले आहेत. गोंड लोकांच्या चालीरिती व भाषाभेद एके ठिकाणीं गोळा करून त्यांच्या दंतकथा व शब्दकोश हिस्लॉपसाहेबांनीं तयार केले व हिंदुस्थानांतील अनार्य जातींच्या इतिहासाच्या संशोधनास मदत केली. हिस्लॉपसाहेबांच्या अगोदर गोंडी भाषा लिपिनिविष्ट झाली नव्हती, व तिकडे कोणा संशोधकांचें लक्ष गेलें नव्हतें. नंतर टेंपल साहेबांनी या भाषेच्या अध्ययनास उत्तेजन देण्यासाठी एतद्देशीय अधिकाऱ्यांना त्यावर निबंध लिहिण्यास प्रोत्साहन दिलें व कित्येक बक्षिसें लाविलीं. त्यांपैकी गोंडी भाषा व व्याकरण यावर एक विस्तृत निबंध उपलब्ध झाला आहे. याचा कांही भाग विविधज्ञानविस्तारा'' च्या ८ व्या वर्षी प्रसिद्ध झाला होता, पण आता तो संपूर्ण अप्रकाशित निबंध मिळाला असून त्याची आज किती उपयुक्तता आहे याचा विचार करून तो आपणांपुढे वाचण्यांत येईल.

त्या काळांत हौसेने व आस्थेने विद्योपासना करणारे दुसरे कित्येक इंग्रज गृहस्थ होते. कॅप्टन जे. फार्सिथ यांनी या प्रांतांतील जंगलें तपासलीं व जंगलखात्याची रचना केली. त्यांनी त्या प्रवासाची मनोरंजक हकीगत असलेलें एक पुस्तक केलें आहे; तें The Highlands of Central India या नांवाने प्रसिद्ध आहे. सर आल्फ्रेड लायल साहेबांनी Asiatic Studies मध्यें वऱ्हाडांतलि लोकांच्या धर्मसमजुतीच्या उत्क्रांतिवर एक निबंध लिहिला आहे; लॉरीसाहेबांनी या प्रांतांतील स्थलवर्णनें, लोकाचार व दंतकथा यावर अनेक मनोरंजक लेख Pioneer मध्यें दिले होते. त्यांचें In the C. P. नामक पुस्तकांत संकलन केलें आहे. पुराणसंशोधनखात्यामार्फत या प्रांतांत जे प्रारंभीं संशोधन झालें त्यांत सागर जिल्ह्यातील खुरई तहसिलींत 'एरण' नांवाच्या गांवीं असलेल्या वैष्णव मंदिराचे अवशेष व वराहमूर्ति हे महत्वाचे शोध होत. या वराहमूर्तीच्या गळ्यांत नररुंडमाळा असून त्या मूर्तीवर तोरमणाच्या एक लेख खोदलेला आहे. शेजारींच असलेल्या शिलेवरील समुद्रगुप्ताच्या लेखावरून असें सिध्द झालें आहे कीं ही वराहमूर्ति अत्यंत प्राचीन असून भागवत धर्माच्या संप्रदायाचा काळ इसवीसनापूर्वी जातो, असें डॉ. भांडारकरांनीं प्रतिपादिलें आहे; त्यामुळे भगवद्गीतेंत ज्यांना बायबलांतील सिद्धांत प्रतिबिंबित झालेले दिसतात अशांचीं तोंडें बंद झालीं आहेत. इतिहासपूर्वकालीन असे दुसरे कित्येक अवशेष नर्मदेच्या खोऱ्यांत सांपडले व बालाघाट जिल्ह्यांत गंगेरिया गावीं १८७० मध्यें तांब्याची प्राचीन अवजारें व आयुधें व चांदीचे चक्राकृती अलंकार सांपडले. संशोधकांनी परीक्षण करून ते इ. स. पूर्वी १५०० ते २००० वर्षांपूर्वींचे असावेत असा अंदाज केला आहे.

भोंसल्यांचें राज्य घेतल्यावर हा प्रांत कांही दिवस लष्करी खात्यामार्फत वहिवाटला गेला. त्याकाळांत राज्य कारभाराची हेळसांड होऊन भोंसलेशाही बरी अशी लोकांचीच नव्हे, तर खुद्द हिस्लॉपसाहेबांची खात्री झाली; व

त्यांनी कलकत्याच्या Friend of India या वर्तमान पत्रांत त्या वेळच्या अंमलदारांविरुद्ध अनेक लेख प्रसिद्ध केले. एकदां तर या अंमलदारांनी Friend of India वर फिर्याद करण्यास मंजूरीहि मागितली होती; पण त्यांच्यावरील आक्षेपाची सत्यता पटूनच कीं काय, वरिष्ट सरकारने तिकडे लक्ष्य देतां लवकरच या प्रांताची चीफ कमिशनरी निर्माण केली व त्यावर त्या काळीं अनुभविक व शहाणे म्हणून नांवाजलेले सर रिचर्ड टॅंपल यांची योजना केली. यांनी हिस्लॉपसाहेबांस आपल्या मसलतीत घेतलें, व प्रांतांतील शिक्षणखात्याची सुधारणा करून त्यावर मुंबई इलाख्यांतील तयार केलेले मराठी इंग्रजी विषय शिकविणारे शिक्षक बोलाविले. ही महाराष्ट्रीय मंडळीची पाहिली पिढी या प्रांतात १८६२–१८६५ पर्यंत मागें पुढे येथे स्थायिक झाली. या मंडळींत एकजूट होती, व ते फुरसतीच्या वेळीं एकत्र जमून हौसेने थोडी फार वाङ्मयसेवाहि करीत असत. सितावर्डीवर त्यांनीं "सीतावर्डी क्लब" नामक एक संस्था काढली होती व तिला सर नसरवानजी टाटा सारख्या मंडळींची मदत होती "धौममहाबळेश्वर वर्णना"चें पहिलें वाचन याच संस्थेपुढे झालें; वामनराव ओकांच्या "माधव निधन" काव्यांतील निवडक वेचें या मंडळीस ऐकाविलें गेले; व हरीपंत पंडितांच्या "नारायणरावंवधनाटकाचे" अनेक प्रवेश येथेच प्रथम चर्चेस निघाले. यशवंतराव उदास हे या संस्थेचे एक उपाध्यक्ष होते, व त्यांनी या सभेसमोर Remarks on the Powada of Shivaji, व "A note on departmental books" असे दुसरे निबंध वाचले होते. हे १८७७ मध्यें वारले. वामनराव कोल्हटकर, वामनराव ओक, हरीपंत पंडित, रघुनाथराव शहाणे, बळवंतराव गोखले वगैरे मंडळी या सभेची पुरस्कर्ती होती व ती संस्था ही मंडळी पोटापाण्यासाठी दूर पांगेतोंपर्यंत मोठ्या टापटिपीने चालली होती. पुढे जरी यांची अशी वाताहात झाली तरी ती आपआपल्या फुरसतीने थोडें फार वाङ्मयकार्य करीत असतच. जबलपूरचे रा. घंटय्या यांनी मराठींत अर्वाचीन काळांतलि पाहिलें "निर्यमक" "मैना" काव्य केलें. या शिवाय "केशरी मंदील" नामक एक नाटक व "मराठी भाषेची मूलपाठिका" नांवाचा एक भाषाविषयक तुलनात्मक निबंध त्यांनी १८८२ मध्यें प्रसिद्ध केला. जबलपूर कॉलेजांत यांच्या स्मरणार्थ दोन बक्षिसें ठेविलीं आहेत. १८७८ ते १८९० पर्यंत जें इतिहाससंशोधनात्मक व वाङ्मयात्मक कार्य महाराष्ट्रांत काव्येतिहाससंग्रह, विविधज्ञानविस्तार व नाट्यकथार्णव या मासिकांच्या द्वारे झालें, त्यांत रा. हरीपंत पंडित' वामनराव ओक व अण्णासाहेब महाजनी यांची मदत किती होती तें सांगण्याचें कारण नाहीं, आणि "काव्यसंग्रहा"ची व्यवस्था वामनराव ओकांकडेस आल्यापासून या प्रांतांतलि मंडळींनीं त्यांत काय काय काम केलें आहे, याची कल्पना वेळोंवेळीं साल‌अखेरीं काव्यसंग्रहकार साह्यकारी मंडळीचा जो उल्लेख करीत असत तो चाळल्यास लक्ष्यांत येईल. श्रीधरराव परांजपे, केशवराव फणसे, के. व्ही. लक्ष्मणराव,दामोदरपंत ओक वगैरे मंडळी पंडित ओकांच्या तालमींत तयार झाली होती.

१८९१ मध्यें नागपुरास कांग्रेस झाली, त्यावेळीं या प्रांतांत राजकीय दृष्टीने जागृती होण्यास सुरवात झाली, असें म्हणण्यास हरकत नाहीं. याच सुमारास हरीपंत पंडित नोकरींतून मोकळे होऊन नागपुरास स्थायिक झाले, व "देशसेवक" वर्तमानपत्र काढून प्रांतभर राजकीय जागृतीच्या चळवळीस विस्तार प्रयत्न सुरू केला. या पूर्वी या प्रांतांत वर्तमानपत्रें निघालीं नाहींत, असें नाहीं पण जो स्पष्टवक्तेपणा व पुढचें धोरण अशा चळवळीस आवश्यक, त्यांच्या अभावीं हीं मुखपत्रें लोकमतांची प्रदर्शक होत नसून केवळ आपल्या छापखान्याची उपयुक्तता दाखविणारीं व गिन्हाइकें मिळविणारीं साधनें होत असत.

या प्रांतांतील उपलब्ध माहिती प्रमाणे "पहिलें" वर्तमानपत्र "फणीन्द्रपूर-मणिप्रकाश" असून तें १८७६ चे सुमारास नागपुरास प्रसिद्ध होत असे. कोणी लक्ष्मणराव कामाठी हे शिळाप्रेसवर काढीत असत; हें चार सहा महिन्यांत बंद पडलें. त्याच सुमारास वर्धा येथें नारायणराव थोरात नांवाचे एक गृहस्थ "वर्धा लहरी" म्हणून एक साप्ताहिक चालवीत. हेंच पत्र त्यांनी १८८१–८२ च्या सुमारास नागपुरास आणलें, पण तेंहि सुमारें चार सहा महिन्यांनी बंद पडलें. १८८४ मध्यें "नागपूरसमाचार" नांवाचें प्रसिद्ध साप्ताहिक सुरू झालें. रा. धोंडोपंत देव म्हणून त्यावेळचे एक नांवाजलेले लेखक या पत्राचे संपादक होते; १८९० मध्यें यांत इंग्रजी मजकुराचा समावेश झाला, व Nagpur and Berar Times असें नामांतर झालें. तेव्हांपासून तें विराम पावेपर्यंत मराठी भागावर रा. गोपाल राजाराम रंगनाथ हे उपसंपादक असत. इर्दा येथें रा. सदाशिवराव पटवर्धन "न्यायसुधा" नांवाचें एक भारदस्त वर्तमानपत्र चालवीत; तें पुढे नागपुरास प्रसिद्ध होई, व रा. टिळकांच्या खटल्यानंतर फौजदारी कायद्याची दुरुस्ती झाली तेव्हां त्याबद्दल नापसंती व्यक्त करून तें पत्र बंद झालें. "सुबोधसिंधु" नांवाचें दुसरें पत्र हर्दास निघे व ब्रम्हाणपुरास "आर्य" नांवाचें एक पत्र कांहीं दिवस चाललें होतें. "टीकाकार" नांवाचें एक सचित्र साप्ताहिक वर्ष दीड वर्ष नागपुरास चाललें होतें.

इंग्रजी साप्ताहिकांत Jogi नांवाचे एक तेलंगी गृहस्थ Independant नामक एक पत्र कांहीं दिवस चालवीत असत, व Bhosla नांवाचें दुसरें एक अल्पजीवि पत्र कृष्णराव करमरकरांनी कांहीं वेळ नागपुरास चालविलें.

नियतकालिकांसंबंधाने माहिती मिळवितां असें समजतें कीं १८७६ मध्यें या प्रांतांत Berar School Paper नांवाचें एक मासिक अस्तित्वांत होतें. १८८६ पासून वर्धा येथें रा. केशवराव जोरवेकर हे "न्यायदर्पण" नांवाचें एक कायद्याचें मासिक काढीत असत. हें सुमारें १५–१६ वर्षे चाललें. प्रसिद्ध "विचित्रपुरी" कादंबरीचें हेच गृहस्थ लेखक असून "शिवराज लीला" नांवाचा शिवाजीच्याच चरित्रावर यांनी एक पद्यग्रंथ रचला होता. रा. गणपतराव

खेरे हे "कारागीर" नामक एक उद्यमपर मासिक नागपुरास वर्ष दोन वर्ष काढीत असत; व उमरावतीस "ज्ञानसंग्रह" मासिक तीन चार साल चालून बंद पडलें. "शेतकरी" नांवाचें दुसरें एक मासिक रा. चोंटवडेकर १८८३ पासून उमरावतीस सरकारच्या आश्रयाने काढीत.

१८९१ पासून नागपुरास वाङ्मय विषयक चळवळी वाढीस लागल्या, व येथे कित्येक नवीं मासिकें व होतकरू लेखक तयार होऊं लागले. रा. विनायकराव षडांगुळे व त्यांचे कित्येक मित्र यांनीं येथें १८९२ मध्यें "नीरजोल्लास" नांवाचें एक लहानसें पण दुमदार मासिक वर्ष दोन वर्ष चालविलें. "लोकरंजन" नांवाचें दुसरें एक मासिक त्याच सुमारास वर्षभर रा. आत्मारामपंत पांडे हे गृहस्थ नागोराव पोशट्टी यांच्या साह्याने चालवीत असत. रा. नारायण वामन टिळकांचें "काव्यकुसुमांजली" हें मासिक याच काळांतलें होय. या काळांत नांवाजलेल्या जुने शास्त्रीपंडितात उत्तररामचरित्रावर टीका लिहिणारे महामहोपाध्याय भटजीशास्त्री घाटे. तिसऱ्या रघुजीवर "रघुराजकल्पलता" नामक संस्कृत ग्रंथकार, वे. शा. सं. गजाननशास्त्री वखरे, वे. शा. सं. कृष्णशास्त्री तेलंग हे अग्रगण्य असून यांचें विद्वानांत मोठें वजन असे.

या नंतरचा काळ म्हणजे १९०१ पासूनचा; हा काळ अनेक विद्यमान लेखकांच्या कर्तृत्वाचा असून त्यावर कांहीं लिहावें असा आमचा तूर्त विचार नाहीं. त्यांचें कार्य सर्वांसमोर आहेच, व आतांपर्यंतची परंपरा पुढे चालविण्यास ते किती समर्थ आहेत याची आणखी प्रशंसा करण्याची जरूरी नाहीं. त्यांनीं सर्वांनीं आपआपल्या हौसेप्रमाणे, कलाप्रमाणे व शक्तीस रोचक होईल अशी थोडीफार सरस्वतीची उपासना करून पूर्वजांचें व ऋषींचें ऋण फेडावें, अशी विनंति आहे.

पुरवणी नं० १

*१ रघोजीच्या अंमला पूर्वी, म्हणजे गोंडांच्या लहान लहान जमीदारांच्या अंमलाखालीं या प्रांतांत स्वस्थता व सुबत्ता नव्हती व येथील शेतकरी कास्तकार-वर्ग त्या अधिकाऱ्यांच्या जुलमाखालीं त्रस्त झाला होता, अशा तऱ्हेचीं वर्णनें या प्रांतांत प्रवास केलेल्या कांहीं यूरोपीयन अधिकाऱ्यांनीं दिलेलीं आहेत. एकंदर नेटीव्हसत्ताच वाईट, व त्यामानाने फक्त कंपनी सरकारचा अंमल सुरू केल्याशिवाय या गरीब रयतेची दैना संपणें नाहीं, अशा मध्यवर्ती कल्पनेने हीं प्रवासवर्णनें प्रेरित झालीं आहेत, असा समज करणें दुराग्रहाचें असून जी माहिती या प्रवाश्यांस आढळली ती कोणत्याहि राजकीय हेतूने रंगविली असें गृहीत धरणें असमंजसपणाचें होईल; ती विश्वसनीय व त्या काळाचें स्वरूप दाखविणारी आहे असेंच प्रत्येक जिज्ञासूने समजलें पाहिजे.

अनुक्रमणिका

जानोजी भोंसल्यांच्या कारकीर्दींत ओरिसाप्रांताची खंडणी थकल्यामुळे ती वसूल करण्यासाठी तेथील भोंसल्यांचे सुभेदार शिवभट यांना १७६१ मध्ये बंगालवर स्वारी करावी लागली. परंतु ही गोष्ट बंगालचा इंग्रज गव्हर्नर व्हान्सिटार्ट (Vansittart) याला रुचली नाही, व तो मीरकासीमला मराठ्यांस ओरिसांतून हांकलून द्यावें, अशी सल्ला देऊं लागला. पुढे इंग्रजांकडे बंगालप्रांताची दिवाणगिरी आल्यापासून ओरिसामध्ये मराठ्यांचें-भोंसल्यांचें-वर्चस्व कमें नाहींसें करावें, निदान त्यानां इंग्रजांचे अंकित कसें करावें याबद्दल राजकारण सुरू झालें, आणि १७६६ मध्ये क्लाईव्हने ओरिसाप्रांताच्या खंडणीची एकमुस्त रकम घेऊन तो प्रांतच भोंसले इंग्रजांच्या स्वाधीन करण्यास राजी होतात कीं काय, या बद्दल मसलत करण्यासाठी नागपुरास जानोजीच्या दरबारी मि. थॉमस मॉट्ट (Thomas Motte) ची रवानगी केली. "संबलपूर येथील हिऱ्याच्या खाणींचा वृत्तांत". (Narra tive of a Journey to the Diamond mines of Sambalpur 1766.) या पुस्तकांत त्या प्रवासाची हकीगत दिली आहे. मॉट्ट हा कलकत्त्यास राहणारा एक व्यापारी असून संबलपुराहून हिऱ्यांचा व्यापार होण्यासारखा आहे कीं काय, मराठ्यांच्या राज्याची खरी अंतःस्थिती कशी आहे, व जानोजी ओरिसा सोडण्यास राजी होईल कीं काय याबद्दल नागपूरच्या दरबारीमंडळींत वाटाघाट करून छडा काढणें, या हेतूने क्लाईव्हसाहेबानें त्याला इकडे पाठविले होतें. यानें आपल्यासमागमे चार्लस स्मिथ, मि. राबे नांवाचा एक इंग्रजी नोकर व कांही शिपाई घेतले होते. हा संबलपूरजवळ पांच कोसावर असलेल्या मानेश्वर नांवाच्या एका गांवीं ता. ३०-५-१७६६ मध्ये पोंहचला व महानदी व 'इब' या नद्यांच्या संगमाजवळ असणाऱ्या हिऱ्यांच्या खाणीपाशी जुलै १६ ला पोंहचला. तेथून "नागवना" मध्ये असलेल्या एका महासर्पाचें दर्शन घेऊन परत निघणार तों त्याचे युरोपियन संवगडी आजारी पडून दोघेहि थोड्याच दिवसांत मरण पावले. आक्टोबर २ ला संबलपूर सोडून सुवर्णरेखा नदी ओलांडून तो एका महिन्याने पुन्हां ब्रिटिशांच्या ताब्यांतील प्रांतांत परत आला. सुवर्णरेखानदीपासून बालासोर पर्यंत त्याला १२ चौक्या लागल्या. प्रत्येक चौकीवर यात्रेकरूंकडून जबर कर वसूल करण्यांत येई; मौरभुंजच्या मुसलमानी राजाचा कर फारच जाचक होता. मराठ्यांचें लष्कर या प्रांतांतून कूच करीत असतां नेहमी शेतकऱ्यांना त्रास देत व लुटालूट करीत असत; त्यामुळे पुष्कळ ठिकाणीं या शिपायांच्या फिरतीच्या वेळेपूर्वीं तयार होणारीं पिकेंच पेरीत असत. म्हणजे त्याकाळीं जानोजीच्या पूर्वेकडील मुलुखावर चांगला बंदोबस्त नव्हता व तेथील जमिनदार व गोंडराजांवर धाक नसल्यामुळे ती मांडलिक मंडळी आपल्या हितास अनुसरून परस्परांवर छापे घालीत असत, व त्यांना आंवरून धरण्याची खटपट जानोजीने केली नाही. नागपूर व देवगड सुभ्यावर त्याचा अंमल उत्कृष्ट होता, पण संबलपूर ओरिसाप्रांतावर मुलकी व्यवस्था फारच अव्यवस्थित होती.

मॉट्टसाहेब परतल्यावर १७७८ मध्ये इंग्रजांनी भोंसल्याच्या दरबारीं मि. अलेक्झांडर ईलियट यांना मुधोजीसाहेब भोसले यांच्याशी क्लाईव्ह साहेबांनी

योजलेली व हेस्टिंग्स साहेबांस पसंत पडलेली मसलत पुढे चालविण्यासाठी भोंसले व इंग्रज यांच्यामध्ये परस्पर स्नेहभावाचा तह करण्यासाठी रवानगी केली. हे इलियटसाहेब लॉर्ड मिंटो गव्हर्नर जनरल यांचे बंधु होते, व हेस्टिंग साहेबांच्या अंतरंगांतील दोस्त होते. जुलैच्या २० तारखेस कलकत्त्यावरून निघून खुष्कीच्या मार्गाने ते कटक येथे आले, व नंतर तेथून नागपुरास जाण्याचा प्रवास त्यांनी ऑगष्ट ११ पासून सुरू केला. (Journal of the road from Cuttack to Nagpur commenced Aug. 11th 1778) हा प्रवास भर पावसाळ्यांत होत असल्यामुळे तो बऱ्याच अडचणींचा झाला यांत नवल नाही; १२ दिवसांत त्यांनी मध्ये एकच मुक्काम करून १६० मैल प्रवास केला, व ता. २३ रोजीं सोनपूर गांठलें. हें बरेंच मोठें खेडें महानदीच्या तीरावर असून येथून भोसल्यांच्या सीमेस प्रारंभ झाला; मुधोजीचें राज्य व बिंबाजींची जहागीर व सोनपूरची जमीदारी यांच्या सीमा जवळच असलेल्या तेल नदीने विभागल्या होत्या. सोनपूरचा जहागीरदार संबलपूरच्या राजाच्या अधिकाराखालीं होता, व तो बिंबाजीच्या सत्तेखालीं असला तरी त्याचें सामर्थ्य त्यावेळीं बिंबाजीच्या तोडीचें होतें. बिंबाजी हा रतनपूर येथे असे. सोनपुराहून निघाल्यावर या प्रवाश्यांस आणखी तुफानी हवा लागली, व ते ७ सप्टेंबरला सारंगगडाजवळ असलेल्या सेमरा नांवाच्या एका खेड्याजवळ येऊन पोंहचले व तेथे मि. इलियट १२ सप्टेंबरला आजारी पडून वारले. त्या वेळचा सारंगगडचा राजा विश्वनाथशा याने मि. इलियट यांच्या दफनाची व्यवस्था केली, व त्याबद्दल त्याला हेस्टिंग साहेबाने एक हत्ती नजर केला. उरलेले प्रवासी नंतर संबलपूरच्या राजाच्या प्रांतांतून बिंबाजीच्या मुलुखांत शिरले, व १७ आक्टोबरला रतनपूरला पोंहचले. तेथे बिंबाजीशी भेटी परत भेटी झाल्यावर ता. १ नोव्हेंबरला ही प्रवासी मंडळी नागपुराहून त्यांना आणण्यासाठी म्हणून महंमदअली बरोबर रवाना झालेल्या भोसल्यांच्या घोडेस्वारांच्या तुकडीबरोबर लांजी–तिरोडा–तारस्याच्या मार्गाने ता. १२ रोजी कन्हान नदी ओलांडून येथे सामोरा आलेल्या बेणीराम पंडीताबरोबर ता. १४ नोव्हेंबरला नागपुरास आली. इलियट साहेबांच्या मृत्युमुळे मुख्य काम न होतां ही मंडळी १२ डिसेंबरपर्यंत नागपुरास स्वस्थ राहिली व मग सावनेर–पांढुर्णा–मार्गाने हुशंगाबादेस कर्नल गॉडर्ड याच्या छावणीस मिळाली.

यानंतर इंग्रजांनी नागपूरच्या दरबारांत चार्लस चापमन याला पाठविलें. हा २२ जानेवारी १७८२ मध्यें नागपुरास दाखल झाला. त्याच सुमारास म्हणजे २८ जानेवारी १७८२ मध्ये बनारसच्या मार्गाने मि. थॉमस नांवाचा एक दुसरा प्रवासी नागपुरास आलेला होता, व त्याच्या सन्मानार्थ रघोजींच्या बागेंत राजाने एक मेजवानी दिली होती असा चापमन साहेबाने उल्लेख केला आहे. त्याने आपल्या प्रवासवर्णनांत छत्तिसगड प्रांतांत पडलेल्या दुर्भिक्षतेचा व अस्वस्थतेचा निर्देश केला आहे. यानंतर १७८७ मध्ये नागपूरच्या दरबारांत रा. फार्स्टर याची कार्नवालिस साहेबानी रवानगी केली. हा १५-१-१७८८ मध्ये नागपुरास

दाखल झाला. मुधोजीच्या लष्कराचा त्यावेळीं झालेली दैना व दरबारांत सुरूं असलेली राजकारणाची धरसोड व हलगर्जीपणा याबद्दल त्याने बरेंच लिहिलें आहे. ११-४-१७८८ च्या खलित्यांत फार्स्टरने मुधोजीच्या राज्य व्यवस्थेचें जें सविस्तर वर्णन दिलें आहे तें मात्र मोठें उद्बोधक आहे. मुधोजींचे स्वरूप, त्याचा स्वभाव, काटकसरी बाणा, बुऱ्हाणशहा किल्लेवाले यांच्याशीं त्याची आदरयुक्त व आगत्याची वर्तणूक; — रघोजी, चिमणाबापू व मन्याबापू या राजपुत्रांचे स्वभाव, धोरणें व कौटुंबिक राजकारण; भोंसल्यांच्या दरबारची रचना व अधिकारी; अधिकारी, राजे व राजपुत्र यांचे परस्पर संबंध व त्यांच्या अंतःस्थ उलाढाली; राजावर व राजपुत्रांवर वजन टाकून त्यांची मतें वळविणारी दरबारी मंडळी; इत्यादि दरबारची हकीगत फार बारकाईने व चटकदारपणाने दिली आहे. तसेंच मुधोजीच्या राज्याचा विस्तार, उत्पन्नांची तपशीलवार कलमें, लष्कराची संख्या, शेजारच्या संस्थानिकांशी भोंसल्यांचे ढीले पडत चाललेले संबंध, व नवा राजवाडा बांधण्यांत राजाची चालत असलेली करमणूक—इत्यादि मनोरंजक हकीगत या खलित्यांत दिलेली आहे. ज्या दरबारीकामानिमित्त फार्स्टरची रवानगी झाली होती त्याची जरूरी नसल्यामुळे कॉर्नवालिसने त्याला १७८९ मध्ये कलकत्त्यास परत बोलावलें; परंतु १७८९ मध्ये त्याची व मि. लेके यांची पुनरपि नागपुरास रवानगी झाली. लेकी साहेबाने लिहिलेल्या वृत्तांतांत भोंसल्यांच्या ओरिसाच्या सुभेदारी व्यवस्थेचें वर्णन आहे; बरमूलच्या खिंडीच्या निसर्गशोभेची तारीफ केली आहे; व त्या मुलखावरील जमीनदाराचा मानमरातब ठेवण्यांत भोंसले सरकार किती काळजी घेतें, याची प्रशंसा केली आहे. सोनपूरच्या जमीदारींत भोंसल्यांच्या सैन्यापासून उपद्रव होतो, तरी त्याबद्दल नागपुरास गेल्यावर दरबारांत वर्दी द्यावी, अशी तेथील राजाने लेकी साहेबास केलेली विनंति; उडिया लोकांची राहणी, रायपूरच्या किल्ल्याचें व तलावाचें वर्णन, रतनपूरची सुपीकता, इत्यादि बऱ्याच गोष्टी या प्रवास वृत्तांत आल्या आहेत. ही मंडळी ३-६-१७९० ला नागपुरास पोंहचली, व २०-८-९० च्या खलित्यांत लेकी साहेबाने रघुजीच्या दरबाराचें व राज्यव्यवस्थेचें वर्णन केलें आहे व राजास हत्ती व घोडे बाळगण्याचा भारी नाद होता, सैन्याची संख्या व दुर्व्यवस्था इत्यादि बारीक सारीक माहिती नमूद केली आहे. फार्स्टर साहेब नागपुरास वरील कामगिरीवर असतानांच ५-१-१७९१ मध्यें वारला. हा मोठा प्रवासी होता व खुष्कीच्या मार्गाने बंगाल प्रांतांतून इंग्लंडपर्यंत प्रवास केलेल्या इंग्रज प्रवाश्यांत हा पहिला प्रवासी होता. यानंतर नागपुरच्या दरबारांत इंग्रजातर्फे दुसऱ्या कोणाची नेमणूक झाली नाही. पण १७९४ मध्ये मेजर रेनेल साहेबाने हिंदुस्थानची भौगोलिक पाहणी सुरूं केली होती. त्या बाबतींत वऱ्हाड, ओरिसा व उत्तर सरकार परगणे या प्रांतांतून खुष्कीच्या मार्गाची पाहणी करण्यासाठीं रघुजीच्या परवानगीने कांही अधिकारी पाठविण्याचें

 योजिलें व त्यास अनुसरुन चुनारगडहून क्यॉ. ब्लंट समागमे ३० शिपाई व

एक जमादार घेऊन २८-१-१७९५ मध्ये कोरिआ जमीदारी, छत्तीसगड, व कांकेरवरून वैरागड सिरोंचा मार्गाने चंद्रपूरावरून निझामशाहीच्या राज्यांत जाण्यास निघाले. ब्लंट (Blunt) साहेबाच्या या प्रवासाची हकीगत Early Europeon Travellers मध्ये दिली आहे व त्यांत कोरियाच्या राजाची भोसल्यास खंडणी देण्याची नाखुशी, लोर्मी व पंडेरिया प्रतापगड येथील गोंड लोकांचे भोसल्याविरुद्ध बंड; बस्तर व कांकेर येथील राजांची भोसल्यांच्या सत्तेस न मानण्याची प्रवृत्ती व त्यामुळे भोसल्यांचे हुकूम न जुमानतां या मंडळीस मदत न करणें वगैरे गोष्टी त्यांत दाखल केल्या आहेत. गोंडी व जंगली मुलुखांत अशी स्थिती असली तरी खुद्द भोसल्यांच्या अधिकारांतील प्रदेशांत पुष्कळ सुव्यवस्था होती व छत्तीसगड रायपूरच्या प्रदेशांत सुबत्ता व शांतता असून व्यापारउदीम सुरळितपणे चालला होता असेंहि त्याच्या नजरेस आलें. मालकाळीचा वसूल धान्याच्या रूपाने होत असल्यामुळे नगद पैशाचा वारंवार तुटवडा पडे. व्यापाराची वाहतुक वंजारी लोकांच्या ताब्यांत असे; ते बैलांच्या पाठीवर हा माल गांवोगांवी नेऊन फुटकळ विकीत असत; पण त्यामुळे रस्ते वगैरे वहिवाटीचे मार्ग नेहमी नादुरुस्त रहात असत. त्यावेळीं वैरागड येथे कापसाची मोठी पेठ होती व ओरिसाकडील व्यापारी मीठ सुपारी व खोबरें नारळ मोबदला देऊन येथे कापूस खरेदी करीत असत व कटककडील उत्तम कापडास लागणारा कच्चा माल बहुदा येथूनच नेत असावेत. 'चांदाजडी' म्हणून जी एके काळीं प्रसिद्ध असलेली कापसाची जात होती तिची भरभराट याच काळांत झाली असावी. ब्लंट साहेब २४-५-१७९५ रोजीं ११२५ मैल प्रवास करून, राजमेहेंद्रीस पोंहचले.

यानंतर या प्रांतांत इंग्रजांतर्फे आलेला वकील हेन्री थॉमस कोल्ब्रूक होय; त्याकाळीं प्राच्यभाषाकोविद म्हणून याची प्रख्याती होती व तो नागपुरास १८-३-१७९९ रोजीं पोहचला. टीपू सुलतान व दौलतराव शिंदे यांच्या विरुद्ध इंग्रजांचीं जीं कारस्थानें चाललीं होतीं त्यांत निझाम व भोसले यांचें साह्य मिळावें म्हणून खलबतें करण्यासाठी कोलब्रूक साहेबाची योजना वेलस्ली साहेबाने केली होती. हा नागपुरास १९-५-१८०१ पर्यंत होता, व या काळांत बाहेर झालेल्या घडामोडीमुळे भोसल्यांच्या दरबारांत आपलें काम संपादितां आलें नाही. श्रीरंगपट्टण जिंकून टिपूचा पाडाव झाला, नाना फडनवीसाच्या मृत्युमुळे पुण्याकडील ताण सैल पडला, व त्यामुळे भोसल्याशी सलगी करण्याचें कारण उरलें नाही; उलट त्याना पायबंद करण्याचा तह कसा करावा याबद्दल कोलब्रूकसाहेबास कलकत्त्याहून नवा कानमंत्र मिळाला. कोलब्रूक साहेबाचें चरित्र त्याच्या चिरंजीवानी लिहिलें आहे, त्यात त्यांच्या रोजनिशीचे जे उतारे दिले आहेत त्यात नागपूर शहर, भोसल्याचा राजवाडा, त्याला राहण्यास दिलेली बाग, राजे व त्याचा दरबार, राजांचा शिकारीचा शोक, भोसल्याच्या राज्याचा विस्तार व व्यवस्था, राजेसाहेबांच्या

सभोवती असणारी दरबारी मंडळी व १७९९ च्या दसऱ्याच्या स्वारीचें वर्णन इत्यादि मनोरंजक व उद्बोधक माहिती आली आहे. याशिवाय एल्फिन्स्टन साहेब, वेलस्ली साहेब व जेंकिन्स साहेब यांचे खलिते व रिपोर्ट व त्यांच्या चरित्र ग्रंथांत आढळणारी फुटकळ स्वरूपाची माहिती याचा समावेश केल्यास त्या काळांतील देश वर्णन, समाजस्थिति, व राज्यव्यवस्था याबद्दल परकीयांची मतें कशीं होतीं, याची कल्पना येते.

अ श्रु – सौ र भ

स्व० साने गुरुजींनी डॉ. वि. भि. कोलते यांना लिहिलेलीं पत्रें खाली देत आहोंत. पत्रें युगवाणीला उधृत करूं दिल्याबद्दल डॉ. कोलत्यांना धन्यवाद द्यावत तेवढे थोडेच. गुरुजींचें पत्रवाङ्मय विशाल, सर्वव्यापी आणि निर्मळ असें आहे. त्यांनी कर्मयोगाचें व्रत घेऊन जणुं पत्रें लिहिला आहेत. गुरुजी आमच्यातून गेले, त्यांना आमच्यात राहणें बरें वाटलें नाही पण गुरुजींचीं हीं असलीं पत्रें ज्या ज्या घरांत नि ज्यांच्या ज्यांच्या अंतःकरणांत असतील त्यांना त्यांना दीपज्योतीं सारखी तीं 'शुभं करोतु' ची प्रेरणा दिल्यावाचून रहाणार नाहीत. भारताच्या सांस्कृतिक जीवनात व विशेषतः मराठी भाषियांच्या हृदय संस्कार-प्रक्रियेंत गुरुजींचें स्थान किंती मोलाचें आहे याची चर्चा होऊन चुकली आहे. घराघरांतून गुरुजी पोंचले आहेत. त्यांचीं पुस्तकें वृंदावनासारखीं प्रत्येक अंगणाची शोभा वाढवीत आहेत आणि त्यांच्या पुस्तकांतील कल्याण-कामना तुळसमंजरी सारखी सौभाग्य सौरभ पसरीत आहे. पूर्वीच्या कथा-कहाण्यांतून प्राणाचें अस्तित्व वृक्षावरून ओळखलें जाई. गुरुजी गेले नि मराठीभाषियांच्या अंगणाअंगणांतील तुळस सुकली असें वाटलें. पण ह्या मंजिऱ्या आहेत––ही वृंदावनें आहेत आणि....श्यामळ सुंदर पर्ण भाराने लवलवून वाऱ्यावर डुलणारी तुळस––!

––संपादक

१ जय हिंद

५३, मेघा भुवन
पारशी कॉलनी.

सेवेशीं कृ. सा. प्रणाम

मी येथें नव्हतों. बेळगांव, पुणें इकडे होतों. मला तिकडे येणें जमणार नाहीं. तुम्ही तार करण्यासाठीं तिकिटें पाठविलीं होतींत. मी काल आलों. आज पोष्टाला सुटी. उद्यां रविवार. हें पत्र तुम्हांस वेळेवर मिळेलच. माझ्या येथील मित्रानें तुम्हांस येण्याची अशक्यता कळविली होतीच. असो.

सोबत तारेसाठीं पाठवलेलीं तिकिटें परत करीत आहें. मी येऊं शकत नाहीं. क्षमस्व सर्वांस स. प्र.

आपला

१।१।४९ **पां. स. साने**

आज नवें वर्ष. तुम्हां सर्वांस सुखाचें जावो. जातीयता नष्ट करो.

★

२ जय हिंद

कृ. स. प्रणाम

तुम्ही सर्वांनीं किती गळ घातलीत ? मी येऊन काय सांगणार ? लोक ज्ञानाचें, बुद्धीचें मोजमाप करूं इच्छिणारे. मजजवळ तर ना ज्ञान, ना तीव्र बुद्धि. साहित्याशीं संबंध तुटलेला. ब्राह्मण्यवृत्ति-ज्ञानप्रधान. मजजवळ नाहीं. मी शूद्र वृत्तीचा मनुष्य. प्रत्यक्ष सेवा आवडते. तुम्ही मला सारे परधर्म आचरायला लावतां. रवीन्द्रनाथ ह्मणत One requires courage to say 'No'. मी म्हटलें. परंतु हरलों. मी दुःखी आहें. तेथें मोठ्या शहरांत येऊन चतुरास्र व जिज्ञासु लोकांना मी काय सांगणार ? मला संकट वाटतें तुम्हांला आनंद झाला. परंतु माझी काय मनःस्थिति ? प्रभूची इच्छा ! अजूनहि तुम्हांला माझी करुणा आली तर पहा. तेथील विद्यार्थ्यांना माझी प्रार्थना कीं मला हें जमत नाहीं. मी साहित्यिक नाहीं. तुरुंगांत मनांतलें लिहीत बसें. ना कला माहीत, ना तंत्र ना इतर गोष्टी. दुसऱ्याचा परधर्म आचरायला लावणें भयावह आहे. त्यांत सर्वांचीच फजीती. आणि आपल्याला चार गोष्टी नीट सांगतां नाहीं आल्या की मला मेल्याहून मेलें वाटतें.

तुम्ही रागावूं नका. Pity me. ज्याच्या जवळ जें आहे तें मागावें. मजजवळ वैचारिक वैभव नाहीं. कां मला लाजवतां ? बघा, अजून मला न या संकटांत पाडतां आलें तर. सर्वांस कृ. स. प्र. क्षमा करा.

तुमचा,
पां. स. साने

★

३ जय हिंद

सेवेशीं कृ. स. प्रणाम,

शेवटीं रडकुंडीस येऊन मी तुमच्याकडे येणार. मी तिसऱ्या वर्गानेंच येईन. तुम्हांला पहिल्या वर्गाचें तिकिट देतां येत असेल तर उरलेले पैसे माझ्या साधना प्रेसला होतील. आजकालचें जें माझें स्वप्न आहे त्याला ती तुमची मदत म्हणून होईल. परंतु वरच्या वर्गाने प्रवास करणें आमचा धर्म नव्हे. आजारीच असतों तर गोष्ट निराळी. मी तेथें एकच दिवस राहीन. अधिक राहिलें म्हणजे व्याख्यानांची गळ घालतात लोक व माझा गुदमरा होतो. इतका खर्च करून लांब जायचें नि लगेच परतायचें हेंहि मनास अप्रशस्त वाटतें. परंतु करूं तरी काय ?

तुमचा महोत्सव सुंदर रीतीने पार पडो. मी क्षणभर येऊन जाणार. विद्यार्थ्यांनी मला क्षमा करावी.....सर्वांस स. प्रणाम.

तुमचा
पां. स. साने

चेक मिळाला. श्री. जोशी यांस फोननें आज कळवीन कीं रिझर्व वगैरे कांहीं नको.

★

४ जय हिंद

साधना
(मराठी साप्ताहिक)
संपादकः—साने गुरुजी

ऑर्थर रोड हॉस्पिटल समोर
ऑर्थर रोड, मुंबई ११
ता. १३-२-१९४९

कृ. सप्रेम प्रणाम

मी तुमच्या आग्रहानें नागपूरला आलों. तुमचा प्रेमळ स्वभाव, तुमचें सौजन्य यांनीं मी तुमचा झालों. प्रिय अशोक, दिलीप, कविता आणि धाकटा बाळ यांची मला आठवण येते. दिलीप तर चिकटून बसे.

तो नि ती एकाच बशींतून श्री. भावे यांचेकडे शिरा खाल्ला. त्याला किती श्लोक येतात. अशोकची शाळा असे. त्याच्या जवळ फारसें बोलतां आलें नाही. परंतु तोही गोड मुलगा आहे. आणि कविताची आई. त्या किती प्रेमानें सारें करीत. तुमच्या कुटुंबांतील सहृदयता नि साधेपणा सुंदर वाटतो.

मी नागपूरला येत नव्हतो. त्याचें एकच कारण मी सांगत असें कीं मजजवळ वैचारिक धन फारसें नाहीं. साहित्याची तेवढी उपासना माझ्याजवळ नाही. नाहींतर मला कधीं आग्रह नाहीं लागत. तुम्हींहि तसें मानणार नाहीं.

तेथील सर्वांचा खेळीमेळीचा स्वभाव मला फार आवडला. कृत्रिमता कोठें नव्हती. श्री दादासाहेबांचा (धर्माधिकारी) अधिक परिचय झाला. त्यांच्या मुलाचा चंदूचाहि. तो चांगलें बोलतो. ज्यांच्याकडे जेवायला गेलों होतों ते श्री. देशमुखहि मला आवडले. तुमच्या सर्व उत्सवास मी हजर राहूं शकलों नाहीं. श्री. कानेटकर फार सुंदर बोलतात. परंतु मला जाणें भाग होतें. प्रा. कुसुमावतींचें तें लहानसें भाषण आवडलें. लघुकथे-वर ते तरूण प्राध्यापक बोलले, त्यांचें काय बरें नांव ? श्री. पुरोहित नांव ना ? त्यांचें भाषणहि मला सुरेख वाटलें. साधनेच्या १९ तारखेच्या अंकांत मी माझें दोन वेळचें भाषण, दादांचें व कुसुमावतींचें दिलें आहे. पुढील अंकांत लघुकथेवरचें व मी तेथे भगिनीमंडळांत, बी. टी. कॉलेज-मध्ये व राष्ट्रीय वाचनालयांत वगैरे बोललों तें थोडेंथोडें देईन. इतरांचें मी ऐकूं शकलों नाहीं. शिक्षणमंत्र्यांचें भाषण नीट ऐकूं आलें नाहीं जरी मी जवळ होतों. असो.

तुमचे प्रिन्सिपॉल फार दिलदार व मोकळे वाटले. त्यांना व इतर सर्वांना माझे कृ. स. प्रणाम सांगा.

तुम्ही कितीतरी सुंदर ग्रंथ लिहिलेत. वाटेंत महानुभाव ग्रंथ बहुतेक चाळले. तुम्ही मोलाची भर घातलीत. मला पत्ताहि नाहीं. माझा संबंध सुटल्यासारखा. वाईट वाटतें याचें. परंतु मी निराळ्या वृत्तीचा व धडपडीचा. असो. तुमचें मनःपूर्वक अभिनंदन. तेथील प्रदर्शनांत कितीतरी कृति. मी चकित झालों. तुमच्या शारदा मंडळानें "महाविदर्भाची मराठी सारस्वत सेवा" असा ग्रंथ तयार करावा. इकडे आम्हांला पत्ता कोठें आहे ? इतरांना असेल. मला तरी फार नाहीं.

मधून पत्र पाठवीत जा. मीहि पाठवीन. अधिक काय लिहूं ! असाच लोभ राहो वाढो. बापूजींच्या गोड गोष्टींचे (भाग पहिला) दोन प्रती पाठवल्या आहेत. एक पुष्पा भावेकडे द्यावी. एक दिलीप वगैरेंना. सर्व मुलांस सप्रेम आशीर्वाद आणि चि. मंजी-काम करणारी-तिलाहि आशीर्वाद.

तुमचा
पां. स. साने

—दिलीप हा लागट बाळ गोड
तशीच आहे कविता प्रसन्न
अशोक बोले बहु लोचनांनीं
मुखावरी हास्य तदीय नाचे
लहान बाळास मुके मदीय
करीन तद्वर्णन मी न शब्दें ॥
(निर्यमक श्लोक. गंमत !)

या वाक्याचा अर्थ काय ?

हिंदीला राज्यभाषेची मान्यता मिळाल्यापासून तिचा अभ्यास सर्वत्र होत आहे. हें शुभलक्षण स्वार्थापाठीं राबविलें जाऊन आम्ही ह्मणूं तीच हिंदी व तिचाच प्रचार झाला पाहिजे असेंहि प्रतिपादन केलें जात आहे. त्यामुळे हिंदी-बद्दल प्रेम टिकेल, बळावेल की कमी होईल याचें उत्तर काळाने द्यावयाचें आहे. 'युगवाणी'चे एक जबलपूरचे वाचक संपादकांना पत्रें लिहून अनेक गोष्टींचा खुलासा, अर्थ नेहमी विचारीत असतात. यावेळी ते संगीत शास्त्रावरील पुस्तकें हिंदीत वाचत असून मातृभाषा मराठी असल्यामुळे त्यांना अर्थ न लागलेलीं वाक्यें त्यांनी युगवाणीच्या संपादकांना पाठवून अर्थ सांगण्याची विनंति केली. त्यापैकी एक वाक्य खालीं दिलें आहे :—

" स्वरमाधुर्य के नितांत अभावमें संगीत साम्राज्यमें जो उपनिवेश प्रस्तुत किया जाता है उसे हिंदुस्थानी परिपक्व संगीत पद्धतिमें धृपद का अभिधन्धान प्रदान करतें हैं । "

या वाक्याचा अर्थ लावल्याने अनर्थ होण्याचा संभव संपादकाला स्पष्ट दिसत असल्यामुळे संपादक मनोरंजनाच्याच अर्थाने ह्या वाक्याकडे कानाडोळा करीत आहे.

[पान २३६ वरून चालू]

या श्लोकांतही कालिदासाची विशिष्ट वर्णनशैली दिसून येते म्हणून कालिदासाने प्रथम हा श्लोक रचून नंतर सध्या सर्वत्र प्रचलित असलेला (' त्वामासार प्रशमित— ' इत्यादि श्लोक रचला असावा असें अनुमान कांहीं विद्वानांनी केलें आहे. रघुवंशांतही अशाच तऱ्हेचें एक उदाहरण दिसते रघु० श्लोक ४७-४८ पहा.) भवभूतिच्या मालती-माधवाच्या हस्तलिखितांचा अभ्यास करून कै. डॉ. रामकृष्णपंत भांडारकरांनी अनुमान केलें होतें कीं भवभूतीने आपलीं नाटकें पुनः पुनः तपासून त्यांत कांहीं ठिकाणीं बदल केले असावे. तसेंच कालिदासानेहि केलें असणें असंभवनीय नाही.

मूळ मेघदूत काव्य 'मन्दाक्रान्ता' वृत्तांत आहे पण डॉ. श्रीखंडे यांनी आपला अनुवाद 'उपजाति' वृत्तांत केला आहे. हें वृत्त पसंत करण्याचें कारण ते पुढील शब्दांत सांगतात [पृ. ८७]--

' सुश्लोक मेघाच्या रचनेस समग्र मूळ अर्थ उत्तम तऱ्हेने यावा या हेतु सिद्ध्यर्थ वृत्त उपजाति हेंच स्वीकारावें असें विचारांतीच मी निश्चित केलें. एका कालिदासीय मन्दाक्रान्तेचा एकाच मराठी मन्दाक्रान्तेंत सामर्थ्याने प्रसाद गुणयुक्त अर्थ आणणें जवळ जवळ अशक्यच आहे असें इतर सर्व तशा अनुवादकांचे स्तुत्य प्रयत्न आदराने लक्षांत घेऊनहि माझें प्रांजळ मत झालें आहे. मन्दाक्रान्ता वृत्ताचेंच अस्तित्व अनुवादाच्या यशस्वितेस आवश्यक आहे असेंहि मुळींच नव्हे. मन्दाक्रान्तेहून प्रचारांतली दीर्घतरवृत्तें म्हणजे शार्दूलविक्रीडित व स्रग्धरा हींच होत, पण मला तीं येथे रोचक वाटलीं नाहींत. अर्धान्ति यमक योजून उपजाति वृत्तच या कार्यासाठी योग्य अर्थवाहक होऊं शकेल व दोन उपजातींत एका मूळ मन्दाक्रान्तेचा अर्थ शक्य तेथे सौष्ठवाने बसवावा व जरूर तर कांहीं स्थलीं त्यासाठी तीन पूर्ण उपजाति योजाव्यात हें धोरण ठेवून हा 'सुश्लोकमेघ' मी पूर्ण केला आहे. '

डॉ. श्रीखंडे म्हणतात त्याप्रमाणें मन्दाक्रान्ता हें वृत्त विरहभावना व्यक्त करण्यास आवश्यकच आहे असें नाहीं, वा मेघदूतांतील सर्वच श्लोकांत विरहभावना वर्णिली आहे असेंही नाहीं. तथापि हें वृत्त मध्यम आकाराचें असून त्यांत एखादी रम्य कल्पना पूर्णपणें मांडण्यास पुरेसा अवकाश सांपडतो म्हणून मेघदूतांतील विविधशब्दचित्रांकरितां तें कालिदासानें पसंत केलें असावें. त्या काव्यांत त्याचा यशस्वी रीतीनें उपयोग झाल्यामुळें क्षेमेन्द्रानें—

सुवशा कालिदासस्य मन्दाक्रान्ता प्रवल्गति ।
सदश्वदमकस्येव काम्बोजतुरगाङ्गना ।

असें कालिदासाच्या मन्दाक्रान्तेचें वर्णन केलें आहे. असो.

डॉ. श्रीखंडे यांनी मूळांतील एका मन्दाक्रान्तेचा अर्थ व्यक्त करण्यासाठीं दोन व क्वचित तीन उपजाती योजिल्या आहेत. असें करण्यानें क्वचित् प्रसंगीं त्यानीं इतरत्र ह्मटल्याप्रमाणें मूळ श्लोकाचें 'बांधेसूद सौंदर्य' नाहींसें झालें आहे. शिवाय कालिदास हा ध्वनिकाव्य लिहिणारा अग्रगण्य कवि! सहृदय मूर्धन्य आनन्दवर्धन यानें त्याच्या मेघदूतांतील एका एका श्लोकांत किती व्यङ्ग्यार्थ भरला आहे. तें दाखविलें आहे. मूळ श्लोकातील कार्य विशद करण्याने कित्येकदां हें त्याचें सौंदर्य नष्ट होण्यांची भीति असते. कित्येकदां पाल्हाळ करण्यानें कवीला अनभिप्रेत असा अर्थही अनुवादांतून निघण्याचा संभव असतो. उदाहरणार्थ सुश्लोक मेघांतील पहिल्या श्लोकाचा अनुवाद घेऊं—

होता कुणी यक्ष, तया कुबेर शापी स्वकार्यी चुकला म्हणोनी
कीं 'कंठ पत्नी विरहांत वर्ष, गेहा त्यजोनी बहुदूर रानीं!'
वसे जरी तमगिरीवरी तो सुच्छाय ज्याच्यावरि वृक्षराजि
तरी न साहे दयितप्रिया त्या प्रियावियोगें भनि यातना जी;
पुण्योदकें तेथील आश्रमींची—पूर्वी तिथें नाहलि जानकी, कीं—
शापें परी यन्महिमा निमाला यक्षासि त्या शांति कुठोनि लोकीं?

या अनुवादांतील चौथ्या व सहाव्या ओळींत त्याच कल्पनेची पुनरुक्ति झाली आहे. शिवाय मूळच्या श्लोकांतील 'शापेनास्तंगमित महिमा' हें यक्षाचें विशेषण त्याला अलका सोडून कां यावें लागलें हें ध्वनित करतें. तसेंच 'जनकतनया-स्नानपुण्योदकेषु' हें 'रामगिर्याश्रमेषु' याचें विशेषण म्हणून योजण्यांत कालि-दासाला यक्षानें रामगिरि हें स्थान आपल्या निवासाकरितां कां पसंत केलें हें सुचवावयाचें होतें. अशा रम्य व पवित्र ठिकाणींही यक्षाला प्रिया वियोगाचें दुःख सहन होइना असा अर्थ कालिदासाला विवक्षित होता असें दिसत नाहीं व विवक्षित असता तरी तो वाच्य करण्यानें त्यांतील रम्यता नष्ट झाली असती! सुश्लोक मेघांत अशा पाल्हाळाची स्थळें फारशीं नाहींत हें बरें!

डॉ. श्रीखंडे यांचा मेघदूतानुवाद किती मनोरम झाला आहे हें दाख-विण्यासाठीं कांहीं श्लोक घेऊं.

अलकेंत गेल्यावर मेघाला आपली पत्नी कशी दिसेल तें यक्ष खालील श्लोकांत सांगतो—

मेघ श्लोक ११ निर्विघ्न तूं पोचुणि बंधुपत्नी पतिव्रता ती बघशील खास
मन्मीलनाची करि जी प्रतीक्षा पुनः पुन्हा मोजुनियां दिनांस;
पुष्पापरी कोमल, दीर्ण व्हावें जें अंगनाचें हृदय क्षणांत
त्या प्रेमपूर्णा बहुधा वियोगीं, आशाच हें बंधन सांवरीत!

गंभीरा नदीचें खालील वर्णन पहा —

मेघ० श्लोक ४०—

छायारूपें तरि पात्रगील प्रवेश गंभीर नदीजलांत,
प्रसन्नचित्तीं, जणुं ती गभीरा स्वभावकांता तुज सांठवील;
म्हणोनि ज्या तच्छफरी उडोनि चकाकती जेविं कटाक्ष लोल,
श्वेता जसे निर्मल ते तियेचे, करी उदासीनपणें न फोल !

मेघ० श्लोक ४१—

जें वेत साम्प्रंपति लागलेलें, भासे जणों सांवरिलें करांनीं
तें वारिरूपी जणुं नील वस्त्र हो स्रस्त जें तीरकटी वरूनी
ऐशा गंभीरेवरि पावतां तूं जाणें पुढें होय तुझें कुठून !
अनावृतांगी रमणी त्यजून जाऊं शके काय रसज्ञ कोण ?

दुसऱ्या श्लोकाच्या 'ज्ञातास्वादो विवृतजघनां को विहातुं समर्थः' या अन्तिम पादांतील उत्तान शृंगार डॉ. श्रीखंडे यांच्या अनुवादांत पुष्कळच सौम्य झाला आहे हें अभिनंदनीय आहे. वास्तविक पहातां हा दुसरा श्लोक कालिदासाचा असेल कीं काय याची शंका वाटते. डॉ. हजरा यांनी आपल्या उपरिनिर्दिष्ट लेखांत या प्रश्नाची चिकित्सा केली आहे. त्यांच्या मते तो दुसऱ्या कोणा कवीचा असून मेघदूतांत प्रक्षिप्त झाला असावा. याचीं त्यांनी दिलेलीं कारणें समर्पक वाटतात, तीं हीं—

(१) गंभीरा या एकाच नदीच्या वर्णनांत वरील दोन श्लोक आले आहेत, पण त्यांत व्यक्त झालेला त्या नदीचा स्वभाव भिन्न प्रकारचा आहे. पहिल्या श्लोकांत गंभीरा नदी आपल्या नांवाप्रमाणेच गंभीर प्रकृतीची उदात्त नायिका वर्णिली आहे. ती आपल्या प्रियकराच्या भेटीविषयीं आतुर आहे, पण ती आपली आतुरता श्वेतकमलाप्रमाणे निर्मल दृष्टिपातांनीं (नीलकमलासारख्या तिर्यक् कटाक्षांनी नव्हे) दाखवीत आहे. दुसऱ्या श्लोकांत त्याच नदीचें वर्णन एखाद्या छचोर स्त्रीप्रमाणे केलें आहे. अशी स्त्री इतरांचें लक्ष आकृष्ट करण्यासाठीं नेसलेलें वस्त्रहि अंगावरून गळूं देते. कालिदासासारखा अभिज्ञ कवि एकाच नदीचीं अशीं भिन्न चित्रें काढणार नाही. (२) मेघदूताच्या पूर्वभागांत लहान मोठ्या दहा नद्या कालिदासाने वर्णिल्या आहेत; त्यांपैकी रेवा, चर्मण्वती व जान्हवी या तीन मोठ्या नद्यांच्या वर्णनासच त्याने एकापेक्षां अधिक श्लोक घातले आहेत. बाकीच्या नद्यांचें वर्णन एक एका श्लोकांतच पूर्ण केलें आहे. गंभीरा ही माळव्यांतील एक क्षुद्र नदी ! हिच्या बाबतींत मात्र पक्षपात करून कालिदासाने दोन श्लोक रचले असतील हें संभवनीय नाही.

डॉ. हजरा यांचें वरील मत मान्य झाल्यास कालिदास अश्लीलता दोषांतून बराचसा मुक्त होईल. कारण गंभीरा नदीच्या वर्णनांतील दुसऱ्या श्लोकांतल्या इतका अश्लीलपणा त्यांच्या काव्यांत इतरत्र दिसत नाही.

अलकेंतील विरहिणी यक्षपत्नीचें खालील सुंदर शद्बचित्र पहा—
मेघ. श्लो. ८८—

त्याल्या सुवस्त्रा मलिनत्व आलें, ऐशी निजांकावरि घेइ वीणा,
माझ्यावरूनी रचिल्या पदांच्या जों लागये ती करूं गोड गाना,
तों अश्रुपातें भिजतात तारा, कशी तरी त्यांस पुसोनि घेती
आलाप, ताना, रचिल्या स्वतांहि, पुनः पुन्हा त्या विसरे तरी ती।

वरील उताऱ्यांवरून डॉ. श्रीखंडे यांच्या मनोहर काव्याची थोडीबहुत कल्पना येईल. तें सर्वत्र सुश्लिष्ट, रसवाही, मधुर व प्रसादगुणयुक्त झालें आहे. त्यांच्या या काव्याच्या एका परीक्षणांत त्यांच्या उपजातिवृत्तांत यति भंग झाला आहे असा दोष दाखविला आहे पण तो बरोबर दिसत नाही. इंद्रवज्रा, उपेन्द्रवज्रा व उपजाति या छोट्या वृत्ताच्या लक्षणांत यतीचा निर्देश नाहीं व कालिदासा सारख्या महाकवींनी या वृत्तांत यति मानलाहि नाही. उदाहरणार्थ 'सुमध्वरे विश्वजिति क्षितीशं निःशेष विश्राणितकोशजातम्' इत्यादि रघुवंशांतील (सर्ग ५, श्लोक १) श्लोक घ्या. हा उपजातिवृत्तांत आहे. या वृत्तांत पांचव्या अक्षरानंतर यति येतो असें मानल्यास वरील दोन्ही पादांत यतिभंग झाला असें मानावें लागेल. असो.

अनुवाद ह्मणून 'सुश्लोक मेघ' मेघदूताशी कांटेकोरपणानें ताडल्यास त्यांत कांही ठिकाणीं अल्प दोष आढळतात. पुढील आवृत्तींत ते काढून टाकावे ह्मणून त्यांचा येथें थोडक्यांत निर्देश करतों—

मेघदूत श्लोक ४—

स प्रत्यग्रैः कुटजकुसुमैः कल्पितार्घाय तस्मै।

सुश्लोक मेघ—पुष्पें प्रफुल्लें नव आश्रमींचीं अर्पोनि तो त्या करि अर्घ्यदानें।

डॉ श्रीखंडे यांनी 'कुटजकुसुमैः' या ऐवजी 'उटजकुसुमैः' असा पाठ घेऊन तदनुसार अनुवाद केला आहे. पण तो पाठ कोणत्याहि प्राचीन टीकेंत आढळत नाही. जिनसेन, स्थिरदेव, मल्लीनाथ इत्यादि प्राचीन ग्रंथकार व टीकाकार 'कुटजकुसुमैः' असाच पाठ देतात. डॉ. श्रीखंडे यांचा आवडता टीकाकार पूर्ण सरस्वती हाहि तोच पाठ स्वीकारतो. दक्षिणावर्तनाथानें 'कुटचकुसुमैः' असा पाठ घऊन त्याच्या अर्थास 'कुटचो गिरिमल्लिका' असा हलायुधकोशांतील आधार दिला आहे. कुड्याचीं फुलें पावसाळयांत दिसतात ह्मणून त्यांच्या निर्देशांत स्वारस्य आहे तसें यक्षानें अर्पिलेलीं फुलें त्या आश्रमांतील होतीं असें वर्णन करण्यांत नाही!

(२) श्लो० १६—

मे०:—किञ्चित्पश्चाद्व्रज लघुगतिर्भूय एवोत्तरेण।

सु० मे०:—जाऊनि मागे लव, तूं त्वरेनें करी पुन्हां उत्तरदिक्प्रयाण.

 येथें 'पश्चात्' याचा अर्थ 'मागें' असा नसून 'पश्चिमदिशेस' असा आहे.

'तूं किंचित् पश्चिमेस वळून नंतर उत्तर दिशेने जा' असें यक्षाला मेघास सांगावयाचें आहे. याच्या पुढील (१७ व्या) श्लोकांत आम्रकूटाचें वर्णन आहे. डॉ. श्रीखंडे रामगिरि हा नागपूर जवळचें रामटेक होय हें मान्य करतात. तेव्हा ते म्हणतात त्याप्रमाणें आम्रकूट अमरकंटक असणें शक्य नाहीं. कारण अमरकंटक ईशान्यादिशेस दूरवर राहतो. तिकडे मेघास नेण्याचें कारण नाही. रामटेकहून किंचित् पश्चिमेस वळून उत्तरेस गेल्यास मध्यप्रदेशांतील अमरवाड्याच्या उत्तरेचे डोंगर लागतील तेच आम्रकूट नांवाने येथे विवक्षित असावे. (सह्याद्रि मासिक खंड १९ पृ. २२१; यांतील आमचा 'मेघदूतांतील रामगिरि' हा लेख पहा.)

(३) श्लोक ५०--

मेघ०— तस्मादच्छेरनुकनखलं शैलराजावतीर्णां
जह्नोः कन्यां सगरतनयस्वर्गसोपानपङ्क्तिम्'

सु० मेघ०— तूं जा हरिद्वारिं तिथुनि गंगे, जों पातली शैलगुरूवरूनी
स्वर्गी चढे सागरसंतती ती सोपानपंक्तीच जिला करूनी;

अनुवादांत कालिदासाने योजिलेले 'कनखल' हें प्राचीन स्थलनाम ठेवणेंच इष्ट आहे. शिवाय हरिद्वाराजवळ त्या नांवाचें तीर्थ अद्यापि विद्यमान आहे. 'सागर' पदाने सगरसंपत्तीचा अर्थ व्यक्त होत असल्याने पुढील 'संतती' शब्द व्यर्थ वाटतो. वृत्ताकरितां सगर याचें सागर केलें असल्यास न कळे ! तसें असल्यास 'अपि माषं मषं कुर्याच्छन्दोभंगं विवर्जयेत्' हा प्राचीन दंडक समर्थनार्थ देतां येईल !

(४) श्लोक ५४—

मे.—ये संरंभोत्पतनरभसाः स्वाङ्गभङ्गाय तस्मिन्
मुक्तध्वानं सपदि शरभा लङ्घयेयुर्भवन्तम्।

सु. मे.—न मार्गी त्यांच्या जरि तूं तरीहि तूंते पहातील जरि क्रमाया
क्रोधांत वेगें उडी मारुनि जे, मोडून घ्याया शरभ स्वकाया !

डॉ. श्रीखंडे यांनी या श्लोकाच्या दुसऱ्या पाठांत मल्लीनाथाने दिलेला 'मुक्ता ध्वानं'हा पाठ स्वीकारून तदनुसार अनुवाद केला आहे. या पाठाने पुष्कळांना चकविलें आहे. त्या ठिकाणीं 'मुक्तध्वानं' (ज्याने गर्जना केली आहे असा) हा पाठ पाहिजे. स्थिरदेव व वल्लभदेव हे मल्लीनाथाहून प्राचीन टीकाकार हा श्लोकार्ध पुढीलप्रमाणे देतात—

ये त्वां मुक्तध्वनि मसहनाः स्वाङ्गभङ्गाय तस्मिन्
दर्पोत्सेकादुपरि शरभा लङ्घयिष्यन्त्यलङ्घ्यम्।

यांतहि 'मुक्तध्वानम्' या सारखाच अर्थ आहे. मेघ गडगडाट करूं लागला कीं सिंहगर्जना करतो आहे असें शरभांना वाटलें. सिंह व

शरभ यांचें जात्याच हाडवैर ! ह्मणून ते क्रोधाने तुझ्यावर उडी मारतील व आपलें शरीर भग्न करून घेतील. त्यांना तूं गारांच्या वर्षावाने जर्जर कर असा या श्लोकांतील अर्थ आहे.

(५) श्लोक ६९

मे.—अन्वेष्टव्यैः कनकसिकतामुष्टि निक्षेपगूढैः
संक्रीडन्ते मणिभिरमरप्रार्थिता यत्र कन्याः ॥

पु. मे.—ज्या प्रार्थनीया अमरांहि व्हाव्या ऐशा तिथे क्रीडति यक्षबाला
सुवर्णवाळूमधिं गूढ मोतीं सख्यांसि ज्या लावित शोधण्याला ?
मूळांतील ' मणि ' शब्दाचा अर्थ 'रत्न' आहे, मोती नव्हे.

(६) श्लोक ८४

मे. श्रोणीभारादलसगमना स्तोकनम्रा स्तनाभ्याम् ।
सु. मे. नितंबभारें हळु चालणारी
किंचिन्नता जी कुचकोरकांनी ॥

या अनुवादांत ' कुचकोरकांनी ' असें रूपक योजिलें आहे. त्याला मूळांत आधार नाही एवढेंच नाही तर ते प्रस्तुत संदर्भात अयुक्तहि आहे, कारण कोरक म्हणजे कळी !

वर दाखविल्याप्रमाणे अत्यल्प दोष डॉ. श्रीखंडे यांच्या अनुवादांत आहेत पण ते त्याच्या गुणसन्निपातात लुप्त झाल्यामुळे भासत नाहीत व त्यांमुळे त्यांच्या अनुवादाला फारसें वैगुण्याहि येत नाही.

डॉ. श्रीखंडे यांनी मेघदूताचा सुंदर अनुवाद केला आहेच पण त्याशिवाय त्यांनी शताधिक पानांची अवतरणिका, मेघाच्या अलकेच्या मार्गाचा नकाशा, टीपा व परिशिष्टें इत्यादिकांनी त्याला परिष्कृत केलें आहे. अवतरणिकेंत मेघदूताचें महत्त्व, त्याचें संविधानक, भारतीय व पाश्चात्य विद्वानांनी केलेले त्याचे अनुवाद, त्यांपैकी प्रत्येकाचे गुणदोष, मेघदूताच्या अनुकरणाने झालेलीं संस्कृत दूतकाव्यें, मेघदूतांतील स्थलमार्ग, मेघदूत व वाल्मीकिरामायण यांतील साम्यस्थलें, मेघदूत आणि श्रीमद्भागवत व योगवासिष्ठ यांतील कल्पनासाम्य मेघदूतांतील कल्पनारम्यता, त्यावर दोन महाभागांनी घेतलेले आक्षेप व त्यांचें निराकरण, डॉ. रायडर डॉ. रवीन्द्रनाथ टागोर, वगैरेंनी केलेली मेघदूताची प्रशंसा, अनुवादांतील उपजाति वृत्ताच्या उपयोगाचें कारण इत्यादि विविध विषय आले आहेत. त्यावरून डॉक्टर साहेबांनी मेघदूताचा कसा सर्वस्पर्शी परामर्श घेतला आहे तें दिसून येईल. या अवतरणिकेंतील विवेचन प्रायः निर्दोष आहे. कालिदासाच्या कालासारखे कांही

प्रश्न अद्यापि विवाद्य आहेत. त्यासंबंधी डॉक्टर साहेबांचीं मतें सर्वांस मान्य होतील

असें नाही. कांही ठिकाणीं किरकोळ दोषहि आढळतील. उदाहरणार्थ श्लोक २९ मधील सिन्धुनदी ही त्यामागील श्लोकांत वर्णिलेल्या निर्विन्ध्या नदीहून भिन्न आहे असें त्यांच्या अनुवादावरून दिसतें पण या नदीचा निर्देश पृ. ५८,५९ वरील मेघाच्या मार्गांत आढळत नाही. असो.

या अवतरणिकेंत मधून मधून डॉ. श्रीखंडे यांनीं स्वतः विषयीं बराच मजकूर घातला आहे तसेंच त्यांच्या रसिक बांधवांनीं, मित्रांनीं व वाचकांनीं त्यांना लिहिलेलीं पत्रें व काढलेले प्रशंसोद्गार यांनाहि मधून मधून स्थान मिळालें आहे. हा सर्व भाग डॉक्टर साहेबांच्या प्रांजळपणानें व लेखनशैलीनें रम्य झाला असला तरी तो इतर गंभीर विषयांच्या विवेचनांत अनाहूतपणे आपल्यासारखा वाटतो व त्यामुळे वाचकांचा रसभंग होतो. मेघदूताशी साक्षात् संबंध नसलेला हा मजकूर शेवटीं एखाद्या परिशिष्टांत दिला असता तर बरें झालें असतें !

डॉ. श्रीखंडे यांच्या 'सुश्लोक मेघा'सारखें मेघदूताचा सरस अनुवाद व सर्वांगीण परिचय करून देणारें पुस्तक मराठींत तर अद्यापि झालें नाहींच पण इतर भाषांतहि असेल की नाही याची शंका आहे. शेवटीं संस्कृतवाङ्मयोदधींतील रत्नांचा परिचय निव्वळ मराठी वाचकांस करून देण्याचें आपलें कार्य डॉ. साहेबांनी चालू ठेवावें व यापुढे कालिदासकृत रघुवंशाचा अनुवाद त्यांनी हातीं घ्यावा असें सुचवून हें लांबलेलें परीक्षण संपवितों. १२-६-५०.

कै. नानासाहेब राजदेरकर

हरिहरेश्वर प्रेसचे साहाय्यक व्यवस्थापक कै. नानासाहेब राजदेरकर यांच्या मृत्यूची बातमी अत्यंत अनपेक्षितपणे कानावर आदळली. शनिवार ता. २९ जुलै रात्रीं १० पर्यंत ते आमच्यांत होते. चार दिवसा पूर्वी त्यांनी छापखान्याचे काम केलें आणि त्यांच्या आत स्वकीयांना दुःखात लोटून त्यांनी इहलोक सोडला.

'युगवाणी'शी त्यांचा संबंध गेल्या आठ दहा महिन्यांत आला. नानांच्या कार्यतत्परते व मेहनतीमुळेच अनेकदा युगवाणी वेळेवर निघाली. प्रत्येक महिन्याची शेवटची तारीख म्हणजे कत्तलची रात्र ठरायची. आम्ही रात्री दीड दोन पर्यंत जागे राहून अंक पुरा करीत असूं. विश्वास, आशा वाटेना की अंक उद्या निघेल. नानांना मी म्हणावें—"नाना, उद्या माझी अत्रु ठिकाणीं राहत नाही." नानांनी म्हणावें—"वा, वा, असं कसं होईल? तुम्ही थकलेले, थोडा वेळ झोपा व मग उठून तयार अंकच पहा." आम्ही लहान मुलें जणुं त्यांच्या दिलाशाने टेबलावर पाय ताणून डोळा लावत असूं आणि नाना सतत हिंडत फिरत काम करून तयार अंक घेऊन आम्हांला उठवायला येत. जीवनांतले हे असले प्रसंग छोटे असतात पण हृदयाचे घर उजळून टाकतात. आमच्यावरचें काम नाना अंगावर घेत व आपण पुढे होऊन पुरें करीत. हीच घाई त्यांना झाली जणुं, आणि ते घाई घाईने निघून गेले. ते गेले खरें पण माझ्या मनावर असा एक कायमचा ठसा उमटवून गेले की युगवाणी वेळेवर निघणार ती त्यांच्याच अदृश्य साह्याने! ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो आणि त्यांच्या कुटुंबियास धैर्य देवो.

—वामन कृष्ण चोरघडे

卐

'युगवाणी'ची छपाई

मुद्रक, प्रकाशक प. वि. बेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका



हिमशिखरें

मराठींतील नवोदित अध्यात्मरुचि कवि श्री. कांती त्रुचे यांचा "हिमशिखरें" नामक गद्यगीतांचा संग्रह, नागपूर वीणा प्रकाशनाने जुलैंत प्रकाशित केला. प्रकाशन समारंभ सुप्रसिद्ध तत्त्वचिकित्सक व गांधीवादाचे आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या समयोचित भाषणाने सिद्ध झाला.

★

साभार पोंच

१ रांगणेकर आणि मराठी रंगभूमि : लेखक— द. रा. गोमकाळे; प्रकाशक— श्री. ना. बनहट्टी, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर. मूल्य १ रु.

२ प्रेयसी कीं माता ? लेखक— शं. वा. कुलकर्णी; प्रकाशक— व. गो. गर्गे, वीणा प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. मूल्य १ रु.

३ जग माझें आहे लेखक— मधुकर आष्टीकर; प्रकाशक व. गो गर्गे, वीणा प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. मूल्य २ रु.

४ पशु-वैद्यक : लेखक— डॉ. य. त्र्यं. गद्रे; प्रकाशक— ठाकूर आणि कं. लि. उमरावती. मूल्य १॥ रु.

५ शामदान : कवि— चिं. ग. देशमुख [बकुलराय] प्रकाशक— व. गो. गर्गे, वीणा प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. मूल्य ३ रु.

६ मधु : लेखक— दत्त एकनाथ सुरगांवकर; प्रकाशक— दिगंबर मारुती धुमाळ, नागपूर प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर. मूल्य २॥ रु,

७ पहिलें पाऊल : लेखक— कृ. शं. कुळकर्णी; प्रकाशक— व. गो. गर्गे, वीणा प्रकाशन, सीताबर्डी, नागपूर, मूल्य ४ रु.

८ गोपांतील सुंदर स्त्रिया : लेखक— वा. रा. कोठारी; प्रकाशक— राजेंद्र रावजी शहा; महाद्वार, पंढरपूर. मूल्य ५ रु.

९ प्यारे राजा बेटा, भाग १, २ लेखक— रिषभदास रांका; संपादक— जमनालाल जैन; प्रकाशक— मूलचंद बड़जाते, भारत जैन महामंडल, वर्धा, मूल्य प्रत्येकी १० आणे.